रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक २५१
www.ramprahar.com
# रामप्रहर
◆ सोमवार, ३० मार्च २०२६ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

अंतरंग

मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे दोन दिवस शिल्लक/३
खोपोलीतील शासकीय विश्रामगृह भग्न अवस्थेत/५
आयपीएलमध्ये किंग विराट कोहलीचा जलवा/८

## अलिबाग–वडखळ मार्गावर वाहतूक कोंडी; पर्यटकांना फटका



**अलिबाग :** अलिबाग ते वडखळ मार्गावर रविवारी मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली असून, पेझारी ते वडखळ दरम्यान दोन्ही बाजूंनी सुमारे ५ ते ६ किलोमीटरपर्यंत वाहनांच्या रांगा लागल्या होत्या. धरमतर पुलावर कोळसा वाहतूक करणारा ट्रक रस्त्याच्या मधोमध बंद पडल्याने ही परिस्थिती निर्माण झाली. ३० किलोमीटरच्या अंतर पार करण्यासाठी अडीच तासांचा कालावधी लागत होता. या अचानक झालेल्या वाहतूक कोंडीचा मोठा फटका शनिवार–रविवारची सुटी घालवून परतणाऱ्या पर्यटकांना बसला. अनेकांना तासनतास वाहनांत अडकून पडावे लागले. वाहनांची गर्दी इतकी वाढली की, पेझारी ते कार्लेखिंड दरम्यानही काही प्रमाणात वाहतूक विस्कळीत झाली. विशेषतः अलिबाग, काशीद, मुरूड, रेवदंडा परिसरातून परतीचा प्रवास करणाऱ्या पर्यटकांची संख्या मोठी असल्याने परिस्थिती आणखी गंभीर झाली.

# काँग्रेसकडून युद्धाचा राजकीय फायद्यासाठी वापर -पंतप्रधान मोदी

## प्रचारसभेत विरोधकांवर घणाघात




**तिरुवनंतपुरम : वृत्तसंस्था**

आखाती देशात युद्धजन्य परिस्थितीत विरोधकांकडून केल्या जाणाऱ्या आरोपांना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केरळम इथे प्रचार सभेतून उत्तर दिले आहे. काँग्रेसवर अफवा पसरवल्याचा आरोप पंतप्रधान मोदींनी केला आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी केरळम दौऱ्यावर असून विधानसभा प्रचारानिमित्त त्यांची सभा झाली. या सभेत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मध्य पूर्वेतील युद्धावरून देशात विरोधकांकडून राजकीय फायदा उठवण्यासाठी जनतेचा जीव धोक्यात टाकला जात असल्याचा आरोप केला. पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, युद्धाचा परिणाम देशातील जनतेवर कमीत कमी व्हावा यासाठी सरकार प्रयत्न करतेय, पण काँग्रेस राजकीय फायद्यासाठी जनतेचं आयुष्य धोक्यात टाकणारी विधाने करत आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी प्रचार सभेत बोलताना म्हटले की, केरळमचे अनेक लोक युद्धजन्य परिस्थिती असलेल्या देशांमध्ये काम करत आहेत. त्यांची सुरक्षा आमच्यासाठी महत्त्वाची आहे. सध्या सर्वांचे लक्ष पश्चिम आशियात सुरू असलेल्या युद्धाकडे आहे. केंद्र सरकार सातत्याने प्रयत्न करत आहे की भारतावर या युद्धाचा कमीत कमी परिणाम व्हावा. सुरुवातीपासूनच सर्व देशांच्या राष्ट्राध्यक्षांसोबत सातत्याने संपर्क ठेवला जात आहे. तिथे अडकलेल्या भारतीयांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात येतेय, मात्र काँग्रेसकडून या संवेदनशील मुद्द्यावरही अफवा पसरवणारी विधाने केली जात आहे. आखाती देशातील लोकांचा जीव त्यामुळे धोक्यात येत आहे, असा घणाघात पंतप्रधान नरेंद्र मोदींनी केला.

## ‘मन की बात’मधून देशवासीयांसोबत संवाद



**नवी दिल्ली :** जागतिक संघर्ष आणि ऊर्जा संकटावर चिंता व्यक्त करत, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या 'मन की बात' कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासियांना पुन्हा एकदा अफवांकडे दुर्लक्ष करून एकता राखण्याचे आवाहन केले.

ते म्हणाले की, हा मार्च महिना जागतिक पातळीवर खूपच उलथापालथींचा होता. आपल्या सगळ्यांच्या लक्षात आहे, की भूतकाळात कोविडमुळे साऱ्या जगाला दीर्घकाळ अनेक अडचणींमधून जावे लागले. आपल्या सगळ्यांनाच अपेक्षा होती की, कोरोनाच्या संकटातून बाहेर पडल्यावर जग नव्या दमाने प्रगतीच्या वाटेवर पुढे जात राहील, पण जगाच्या वेगवेगळ्या भागांमध्ये सतत युद्ध आणि संघर्षाची परिस्थिती उत्पन्न होत राहिली. सध्या आपल्या शेजारी एक महिन्यापासून भीषण युद्ध चालू आहे. आपल्या लक्षावधी कुटुंबांचे सगे–सोयरे या देशांमध्ये राहतात, विशेषतः आखाती देशांमध्ये काम करतात. अशा एक कोटींहून अधिक भारतीयांना सर्वतोपरी मदत करण्याबद्दल, मी आखाती देशांना विशेष धन्यवाद देतो.

हा देशाच्या १४० कोटी देशवासीयांच्या हिताशी संबंधित विषय आहे, आणि यामध्ये स्वार्थाने बरबटलेल्या राजकारणाला अजिबात थारा नाही. अशा स्थितीत जे लोक अफवा पसरवत आहेत. सर्व देशवासीयांना जागरूक राहावे, अफवांना बळी पडू नये.

### योजना, उपक्रमांची दिली माहिती

प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेच्या माध्यमातून लोकांच्या जीवनात घडवून आणलेल्या बदलांच्या विषयाचाही त्यांनी समावेश केला. 'माय इंडिया' उपक्रमांतर्गत युवकांना राष्ट्रउभारणीशी कसे जोडले जात आहे, हे स्पष्ट केले. 'बजेट क्वेस्ट'मधून युवकांची मते समोर आली, जी देशाच्या विकासातील सक्रिय सहभागाचे प्रतिबिंब आहेत.

### क्रिकेटप्रेमींसाठी जोशपूर्ण महिना

कार्यक्रमादरम्यान पंतप्रधानांनी देशातील खेळांबद्दल वाढता उत्साह आणि त्यातील कामगिरीचाही उल्लेख केला. देशभरच्या क्रिकेटच्या चाहत्यांसाठी हा महिना एकदम जोशपूर्ण आणि उत्साही राहिला आहे. भारतानं जेव्हा टी ट्वेंटी विश्वचषकामध्ये ऐतिहासिक विजय मिळवला तेव्हा देशाच्या कानाकोपऱ्यात आनंदाच्या लाटा उसळल्या.

# लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवानिमित्त रामपर्व सोहळा



(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दानशूर व्यक्तिमत्व, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित रामपर्व हा भव्य सांस्कृतिक सोहळा श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनियर कॉलेज गव्हाण–कोपर, माजी विद्यार्थी आणि सहकारी यांच्या वतीने मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात झाला.

या कार्यक्रमाला विद्यार्थी, माजी विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठी गर्दी केली होती. संपूर्ण परिसर सांस्कृतिक वातावरणाने न्हाऊन निघाला होता. यावेळी माजी विद्यार्थी संघटना व श्री छत्रपती शिवाजी विद्यालय यांच्या वतीने ‘रामपर्व पुरस्कार २०२६’ मानपत्र देऊन लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सपत्नीक भव्य सन्मान करण्यात आला. या भव्य दिव्य सोहळ्यानिमित्त आयोजक, संयोजक, ग्रामस्थ, हितचिंतकांचे लोकनेते रामशेठ रामशेठ ठाकूर यांनी मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनियर कॉलेज गव्हाण–कोपर येथे झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते रामशेठ ठाकूर हे उपस्थित होते. प्रमुख पाहुणे म्हणून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या सुविद्य पत्नी शकुंतला रामशेठ ठाकूर, माजी नगराध्यक्ष व संस्थेचे जनरल बॉडी सदस्य जे.एम. म्हात्रे, भाजपचे राज्य परिषद सदस्य व स्थानिक स्कुल कमिटी चेअरमन अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते व जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख,कॉगेसचे जिल्हाध्यक्ष व जनरल बॉडी सदस्य महेंद्र घरत, भारताचे माजी कसोटीपटू निलेश कुलकर्णी, पनवेल पंचायत समितीच्या सभापती रंजना वास्कर, महात्मा फुले महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.गणेश ठाकूर, माजी नगरसेवक अनिल भगत, नगरसेविका दर्शना भोईर, नगरसेविका प्रतिभा भोईर, माजी पंचायत समिती सदस्य भाऊशेठ पाटील, जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या संचालक अर्चना ठाकूर, ज्येष्ठ सहकारी बी. टी. कांबळे, मजीद सोलकर, एम. डी. खारकर, गोपीनाथ कोळी, हरीभाऊ देशमुख, एकनाथ देशमुख, गुलाब नाईक, मोरेश्वर देशमुख, वसंतशेठ पाटील, रयत शिक्षण संस्थेच्या रायगड विभागाचे सहाय्यक विभागीय अधिकारी विलासराव जगताप, माजी पंचायत समिती सदस्या रत्नप्रभा घरत, जिल्हा परिषद सदस्या निकिता खारकर, पंचायत समिती सदस्या जिज्ञासा कोळी, वितेश म्हात्रे, अनंता ठाकूर, विजय घरत, उत्तम कोळी, ॲड.राहुल घरत, विश्वनाथ कोळी, संजीव पाटील, मनोज आंग्रे, सी.एल. ठाकूर, योगिता भगत, सुहास भगत, राम मोकल, हेमंत ठाकूर, जयवंत देशमुख, साईचरण म्हात्रे, किशोर कोळी, निलेश खारकर, वैभव घरत, कामिनी कोळी, सुधीर ठाकूर, धीरज ओवळेकर, विद्यालयाच्या प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, **(पान २ वर..)**

## निवडक

### अटल सागरी सेतूवरून दोन कोटी वाहनांचा प्रवास

**मुंबई :** मुंबईला वेगाने विकसित होत असलेल्या तिसऱ्या मुंबईशी जोडणाऱ्या अटल सागरी सेतूवरून २६ महिन्यांत दोन कोटी वाहनांनी प्रवास केला आहे. यामुळे भारतातील सर्वात लांब सागरी सेतू असलेल्या अटल सेतूनं एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. ही माहिती एमएमआरडीए प्रशासनाने दिली. अटल सेतू दक्षिण मुंबईतील शिवडीला नवी मुंबईतील चिरले या गावाशी जोडतो, ज्यामुळे प्रवासाचा वेळ तासाभरावरून अवघ्या २० मिनिटांवर आला आहे. **(सविस्तर पान २ वर..)**

### पाकची दयनीय अवस्था; युद्धामुळे लॉकडाऊन लागू

**इस्लामाबाद :** इराण अमेरिका आणि इस्त्रायल यांच्यात सुरू असलेल्या युद्धामुळे अनेक देशांची तेलवाहू, गॅस वाहू जहाजे ही होर्मूझच्या सामुद्रधुनीत अडकले, आणि देशभर लोकांच्या गॅस आणि तेलाचे वांदे झाले. याच गॅस टंचाईचा सर्वात मोठा फटका हा भारताच्या शेजारील देशाला पाकिस्तानला बसला आहे. अवस्था इतकी दयनीय झाली की पाकिस्तान सरकारने स्मार्ट लॉकडाऊन हे लागू केले आहे.

# रायगडातील एकही अंगणवाडी अंधारात राहणार नाही -राजिप अध्यक्ष वाकडीकर



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेलमधील सक्रिय पत्रकारांची नोंदणीकृत संस्था असणाऱ्या पनवेल तालुका पत्रकार विकास मंचाने रविवारी (दि.२९) रायगड जिल्हा परिषदेचे नवनिर्वाचित अध्यक्ष मंगेश वाकडीकर यांच्या समवेत वार्तालाप कार्यक्रमाचे आयोजन केले होते. मंचातील तमाम सदस्यांनी मंगेश वाकडीकर यांचा यावेळी सत्कार करून त्यांना आगामी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

मंगेश वाकडीकर यांनी अत्यंत विस्तृतपणे त्यांची कार्यपद्धती आणि व्हिजन हे मंचातील सदस्यांसमवेत शेअर केले. दोन दिवसांपूर्वी सादर केलेल्या अर्थसंकल्पाबाबतदेखील मंगेश वाकडीकर यांनी विस्तृत विवेचन केले. या अर्थसंकल्पामध्ये जवळपास ७०० अंगणवाड्यांवरती विद्युत जोडणी न झाल्याचा मुद्दा अग्रस्थानी ठेवला असल्याचे त्यांनी सांगितले.

हा मुद्दा आम्ही प्राधान्य क्रमाने हाती घेत जिल्ह्यामधील एकही अंगणवाडी अंधारात ठेवणार नाही असा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला. **(पान २ वर..)**

> **भाजपच्या माध्यमातून संघटन करण्यासाठीदेखील मी सक्रिय आहे आणि यासोबतच मला लोकनेते रामशेठ ठाकूरसाहेब, आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्यासह आमच्या सर्वच ज्येष्ठ नेत्यांचे मार्गदर्शन आणि आशीर्वाद लाभले आहेत. या पाठबळाच्या व शिदोरीच्या जोरावर मी निश्चितच लक्षणीय कामगिरी करून दाखवेन.**
> **–मंगेश वाकडीकर,** अध्यक्ष, रायगड जिल्हा परिषद

# महाराष्ट्राच्या अनेक भागात वादळी वाऱ्यासह पावसाचा अंदाज



**मुंबई : प्रतिनिधी**

३० मार्चपासून महाराष्ट्राच्या अनेक भागांमध्ये ढगाळ वातावरण आणि दुपारच्या वेळी मेघगर्जनेसह पावसाचे सत्र सुरू होण्याची शक्यता आहे. ४ एप्रिलपर्यंत गारपीट आणि सोसाट्याचा वारा वाहण्याचीही शक्यता वर्तवण्यात आली आहे.

हवामान विभागाच्या माहितीनुसार ३० मार्च रोजी खानदेश, मराठवाडा, पश्चिम विदर्भ आणि मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्याच्या प्रदेशांमध्ये हवामानाची तीव्रता अधिक असण्याचा अंदाज आहे. या भागांमध्ये विजांचा कडकडाट, सोसाट्याचा वारा आणि काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता आहे. ३१ मार्च रोजी हवामानाची तीव्रता कमी झाली तरीही वातावरणातील अस्थिरता कायम राहील. काही तुरळक ठिकाणी हलका पाऊस आणि ढगाळ वातावरण निर्माण होईल.

१ ते ४ एप्रिल या कालावधीत वादळांची तीव्रता पुन्हा वाढेल, असा हवामान विभागाचा अंदाज आहे. मध्य महाराष्ट्र, खानदेश, मराठवाडा आणि विदर्भ या संपूर्ण पट्ट्यात सर्वत्र पाऊस, मेघगर्जनेसह वादळे आणि गारपीट होण्याची शक्यता आहे. सध्या रब्बी हंगामातील काढणीची कामे जोरात सुरू आहेत. त्यामुळे कृषी विभागानं शेतकऱ्यांना पिकांच्या संरक्षणाला प्राधान्य देण्याचे आवाहन केले आहे. कृषी विभागाने म्हटले की, कापणी केलेली पिके पावसापासून आणि ओलाव्यामुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी तत्काळ सुरक्षित ठिकाणी हलवावीत. जलरोधक ताडपत्रीने झाकावीत. अचानक येणाऱ्या वाऱ्यामुळे किंवा गारपिटीमुळे होणारे नुकसान टाळण्यासाठी शेतकऱ्यांनी स्थानिक हवामानाच्या अंदाजानुसार उर्वरित कापणी किंवा फवारणीच्या कामांचे नियोजन करावे.

वादळाच्या वेळी झाडांखाली किंवा तात्पुरत्या पत्र्याच्या शेडमध्ये उभे राहणे टाळा. विद्युत ट्रान्सफॉर्मर, विजेचे खांब आणि उच्च–व्होल्टेज पारेषण वाहिन्यांपासून सुरक्षित अंतर ठेवा. पाळीव जनावरांना मोकळ्या शेतांपासून दूर, मजबूत, बंद निवाऱ्यांमध्ये हलवल्याची खात्री करा, असे कृषी विभागाने शेतकऱ्यांना आवाहन केले.

# येत्या ३ एप्रिलपासून दोन नव्या मेट्रो मार्गिका सेवेत

**मुंबई : प्रतिनिधी**

अनेक दिवसांपासून प्रतीक्षेत असलेल्या मेट्रो प्रकल्पांबाबत अखेर मोठा निर्णय घेण्यात आला आहे. दहिसर ते मिरा–भाईंदर मेट्रो ९ आणि अंधेरी पश्चिम ते मंडाले (मानखुर्द) मेट्रो २B या दोन महत्त्वाच्या मार्गिकांच्या पहिल्या टप्प्यांचे लोकार्पण आता निश्चित झाले असून, येत्या ३ एप्रिलपासून या मार्गांवर मेट्रो धावणार आहे.

या मार्गिकांना सुरक्षा प्रमाणपत्र मिळूनही काही महिन्यांपासून उद्घाटन लांबणीवर पडले होते. निवडणूक आचारसंहिता आणि इतर प्रशासकीय कारणांमुळे हा विलंब झाला असून अखेर आता ३ एप्रिल रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन होणार आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांचीही हा उदघाटनाला उपस्तिथी असणार आहे.

या दोन्ही मार्गिका सुरू झाल्यानंतर मुंबईतील कार्यरत मेट्रो मार्गिकांची संख्या सहा होणार आहे. विशेष म्हणजे, मेट्रो ९ च्या माध्यमातून ठाणे जिल्ह्यालाही पहिल्यांदाच मेट्रो सेवा मिळणार आहे. याच कार्यक्रमात बीकेसीतील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी महत्त्वाच्या ‘पॉड टॅक्सी’ प्रकल्पाचे भूमिपूजनही होणार आहे. वांद्रे पूर्व ते कुर्ला दरम्यान सुमारे ८.८ किमी लांबीचा हा प्रकल्प उभारला जाणार असून, भविष्यातील शहरी वाहतुकीसाठी हा मोठा टप्पा मानला जात आहे.



## मुंबईतील डबेवाले सहा दिवस सुट्टीवर

**मुंबई :** मुंबई डबेवाला असोसिएशनकडून ३० मार्च ते ४ एप्रिल या कालावधीत डबे वितरण सेवा पूर्णपणे बंद ठेवण्याचा निर्णय जाहीर करण्यात आला आहे. ग्रामदेवतेच्या उत्सवानिमित्त दरवर्षी घेतली जाणारी ही सुट्टी असल्याचे असोसिएशनने सांगितले. या कालावधीत मुंबई आणि उपनगरांमध्ये डबेवाल्यांची सेवा मिळणार नाही. त्यामुळे लाखो नोकरदारांना पर्यायी जेवणाची व्यवस्था करावी लागणार आहे. अनेक वर्षांपासून अखंडपणे सेवा देणारे डबेवाले या काळात गावी जाऊन धार्मिक विधी आणि पारंपरिक उत्सवांमध्ये सहभागी होतात.

# माणगावजवळील नाणोरे गावाच्या हद्दीत आढळली मगरींची पिल्ले

## वनविभाग आणि रेस्क्यू टीमकडून जीवदान



**पाली : प्रतिनिधी**

माणगाव बायपास रोडचे काम सुरू असताना, नाणोरे गावाच्या हद्दीत दोन मगरींची पिल्ले आढळल्याने परिसरात एकच खळबळ उडाली होती. मात्र, वनविभाग आणि स्थानिक रेस्क्यू टीमच्या सतर्कतेमुळे या दोन्ही मगरींना सुरक्षितरीत्या रेस्क्यू करण्यात यश आले आहे.

नाणोरे गावाजवळ काही वर्षांपूर्वी पुलाच्या फाउंडेशनसाठी मोठे खड्डे खोदण्यात आले होते. कालांतराने पावसाळ्यात या खड्ड्यांमध्ये पाणी साचले आणि त्याचे रूपांतर एका छोट्या डबक्यात झाले. याच साचलेल्या पाण्यात मगरींचा वावर सुरू झाला होता. सध्या महामार्गाचे काम पुन्हा सुरू झाल्याने, खड्ड्यांमध्ये भराव टाकण्याचे काम हाती घेण्यात आले. पाणी उपसल्यानंतर कामगारांना चिखलात दोन मगरींची पिल्ले दिसून आली. कामगारांनी प्रसंगावधान राखत तत्काळ ही माहिती स्थानिक ग्रामस्थांना दिली.

ग्रामस्थांनी घटनेचे गांभीर्य ओळखून वनविभाग आणि स्थानिक रेस्क्यू संस्थेला पाचारण केले. रेस्क्यू टीमने घटनास्थळी दाखल होत चिखलात अडकलेल्या मगरींचा शोध घेतला. साधारण दोन ते अडीच वर्षांची आणि ३ फूट लांबीची ही दोन पिल्ले असल्याचे समोर आले.

वनविभागाच्या कायदेशीर प्रक्रियेनंतर आणि वैद्यकीय तपासणीनंतर या दोन्ही मगरींच्या पिल्लांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात सुरक्षितरीत्या सोडून देण्यात आले आहे.

# आज एमसीएची सीईटी प्रवेश परीक्षा

**मुंबई : प्रतिनिधी**

शैक्षणिक वर्ष २०२६–२७ साठी मास्टर ऑफ कॉम्प्युटर ॲप्लिकेशन (एमसीए) या पदव्युत्तर अभ्यासक्रमाची सामाईक प्रवेश परीक्षा (सीईटी) सोमवारी (दि.३०) राज्यभरात आयोजित करण्यात येणार आहे. State Common Entrance Test Cell मार्फत ही परीक्षा संगणकाधारित पद्धतीने घेण्यात येणार असून राज्यातील सर्व ३६ जिल्ह्यांतील विविध परीक्षा केंद्रांवर तिचे आयोजन करण्यात आले आहे. यंदा या परीक्षेसाठी तब्बल ५५,५६७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली असून मोठ्या संख्येने विद्यार्थी या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होणार आहेत.

यावर्षीच्या नोंदणीमध्ये १९६ अनाथ विद्यार्थी तसेच ९६ दिव्यांग विद्यार्थ्यांचाही समावेश आहे. त्यामुळे सर्व घटकांतील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही परीक्षा महत्त्वाची ठरत आहे. मागील वर्षी म्हणजेच २०२५–२६ मध्ये एमसीए सीईटीसाठी ५६,२५७ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली होती. मागील काही वर्षांच्या तुलनेत विद्यार्थ्यांची वाढती संख्या या अभ्यासक्रमाकडे वाढत असलेला कल दर्शवते.

संगणकाधारित पद्धतीमुळे परीक्षा प्रक्रिया अधिक पारदर्शक व जलद होत असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले. एकूणच, राज्यभरात मोठ्या प्रमाणावर एमसीए सीईटी परीक्षा पार पडण्याची तयारी पूर्ण झाली असून विद्यार्थ्यांमध्ये उत्सुकतेचे वातावरण पाहायला मिळत आहे.

# अटल सागरी सेतूवरून २६ महिन्यांत दोन कोटी वाहनांचा प्रवास!

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबईला वेगाने विकसित होत असलेल्या तिसऱ्या मुंबईशी जोडणाऱ्या अटल सागरी सेतूवरून २६ महिन्यांत २ कोटी वाहनांनी प्रवास केला आहे. यामुळे भारतातील सर्वात लांब सागरी सेतू असलेल्या अटल सेतूनं एक ऐतिहासिक टप्पा गाठला आहे. ही माहिती एमएमआरडीए प्रशासनाने दिली.



नवा उच्चांक गाठणाऱ्या अटल सेतूचे १३ जानेवारी २०२४ रोजी उद्घाटन झाले. उद्घाटन झाल्यापासून, या पुलावर २ कोटींहून अधिक वाहनांच्या प्रवासाची नोंद झाली आहे. वाहनांच्या नोंदणीनुसार २७ मार्च २०२६ रोजी २,००,००,३१६ व्या वाहनाने अटल सेतूवरून प्रवास केला आहे. हा क्षण मुंबई महानगर क्षेत्रातील प्रत्येक प्रवासी, प्रत्येक कुटुंबासाठी विशेष आहे. या माध्यमातून नवीन जीवनवाहिनीनं क्रांती घडवून आणली आहे, असं म्हटल्यास वावगं ठरणार नाही, असे एमएमआरडीए प्रशासनाने सांगितले.

दुर्गम भाग ते मुख्य शहर, अवघ्या काही मिनिटांत : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते उद्घाटन झालेला अटल सेतू दक्षिण मुंबईतील शिवडीला नवी मुंबईतील चिरले या गावाशी जोडतो, ज्यामुळे प्रवासाचा वेळ तासाभरावरून अवघ्या २० मिनिटांवर आला आहे. केवळ दोन वर्षांत या सेतूनं फक्त दळणवळणाची परिभाषा बदलली नाही, तर अर्थव्यवस्थेलाही गती दिली आहे. व्यापार वाढवणं, इंधनाचा खर्च कमी करणं, प्रवास सुलभ करणं आणि जागतिक दर्जाच्या पायाभूत सुविधांचे नवे मानक प्रस्थापित करणं हे या पुलानं साध्य केलं आहे.

अटल सेतू हा केवळ एक पूल नाही, तर ती मुंबई महानगर क्षेत्राची जीवनवाहिनी आहे. पुलावरून २ कोटी वाहनांनी प्रवास केल्यानंतर हे सिद्ध झालं आहे की, जेव्हा महाराष्ट्र काही घडवतो त्यात गतिमान भविष्याची झलक पाहायला मिळते, असे एमएमआरडीए प्रशासनाने सांगितले.

अटल सेतूचे फायदे

अटल सेतू अर्थात मुंबई ट्रान्स हार्बर लिंक (MTHL) हा भारतातील सर्वात लांब सागरी पूल आहे, जो दक्षिण मुंबईतील शिवडीला नवी मुंबईतील न्हावा-शेवाशी जोडतो. हा सहा मार्गिकांचा पूल आहे. शिवडी (मुंबई) ते न्हावा-शेवा (नवी मुंबई/चिर्ले) पर्यंतच्या भागाला जोडणारा हा पूल एकूण २१.८ किमी लांबीचा आहे. पुलाचा १६.५ किमीचा भाग समुद्रावर आणि ५.५ किमीचा भाग जमिनीवर आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या पुलाचे उद्घाटन झाले. हा पूल दक्षिण मुंबई, नवी मुंबई आणि जेएनपीटी (JNPT) बंदराला एकमेकांशी जोडतो. फक्त मुंबईच नाही तर संपूर्ण मुंबई महानगर क्षेत्राच्या आर्थिक विकासाला गती देण्यात अटल सेतू एका प्रमुख सहाय्यकाची भूमिका बजावतो.

**अटल सेतूवरून २६ महिन्यांत...**

१,८१,९५,७१८ खाजगी वाहनांची पुलावरून वाहतूक. हा आकडा एकूण वाहतुकीच्या ९१% पेक्षा अधिक आहे. ५,९८,५२५ लघु व्यावसायिक वाहनं, मिनीबस, बस आणि ट्रकची पुलावरून वाहतूक. १२,०६,०७३ मध्यम, जड आणि अति-अवजड वाहनांच्या वाहतुकीची नोंद.

## दादर रत्नागिरी रेल्वे पूर्ववत करण्यासाठी रेल्वेमंत्र्यांना पत्र



**चौकः प्रतिनिधी**

दादर-रत्नागिरी पॅसेंजर ही रेल्वे गाडी पूर्वीप्रमाणे दादर येथून सोडण्यात यावी या कोकण विकास परिषदेच्या मागणीला खासदार रवींद्र वायकर यांनी पाठिंबा दिला असून त्यांनी रेल्वे मंत्री यांना पत्र दिले आहे.

सध्या दिवा-रत्नागिरी ही पॅसेंजर गाडी कोरोना पूर्वी दादर वरून सुटायची.त्याचा फायदा मुंबईत कुठेही राहणारा कोकणी माणूस याला फायदा व्हायचा, पण कालांतराने दादर ऐवजी दिवा येथून सोडण्यात आल्याने सर्वच प्रवासी यांना ते त्रासदायक ठरू लागले, याची दखल कोकण विकास परिषदेने घेतली. यासाठी खासदार रवींद्र वायकर यांनी यापूर्वी म्हणजे दिनांक १० जानेवरी २०२५ रोजी रेल्वे मंत्री यांना पत्र दिले होते.याची आठवण नवीन पत्रात नमूद करण्यात आली आहे. कोकणात जाणारा माणूस हा साधारण नोकरी पेशातील आहे. त्याला दादर वरून सुटत असलेली कोकण रेल्वे गाडी सोयीस्कर आहे.

मुंबई, मुंबई उपनगर आणि मीरा भाईंदर या परिसरातून येणाऱ्या कोकण रेल्वे प्रवाशी यांच्यासाठी त्रासदायक आहे,तसेच दिवा येथून रेल्वे गाडी बदलून पुन्हा मुंबई, मुंबई उपनगर, मीरा भाईंदर या ठिकाणी जाणे त्रासदायक आहे. याचा विचार रेल्वे मंत्री यांनी करून पुन्हा ही गाडी दादर वरून सोडण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यासाठी भारतीय जनता पक्षाचे प्रदेश अध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे मंत्री यांची लवकरच भेट घेण्यात येईल, असे कोकण विकास परिषद यांच्या वतीने सांगण्यात आले.

## मॅंग्रोव्ह स्वच्छता मोहीम नेरुळमध्ये यशस्वी

**नवी मुंबई : बातमीदार**

एन्व्हायर्नमेंट लाईफ फाउंडेशनच्या ‘मॅंग्रोव्ह सोल्जर्स’तर्फे नेरुळ येथे आयोजित करण्यात आलेली २९३ वी मॅंग्रोव्ह स्वच्छता मोहीम उत्साहात आणि यशस्वीपणे पार पडली. या मोहिमेला मॅंग्रोव्ह फाउंडेशन तसेच नवी मुंबई महानगरपालिकेकडून आवश्यक लॉजिस्टिक सहाय्य मिळाल्याचे या स्वच्छता चळवळीचे प्रमुख धर्मेश बराई यांनी सांगितले.

या आठवड्याला डब्ल्यूडब्ल्यूएफ इंडियाच्या ‘अर्थ अवर’च्या २० वर्षांच्या निमित्ताने समर्पित करण्यात आले होते. या उपक्रमामागील मुख्य उद्देश नागरिकांनी अनावश्यक दिवे बंद करून ऊर्जा बचतीच्या सवयी केवळ एका तासापुरत्या न ठेवता वर्षभर अंगीकाराव्यात, असा होता.

एन्व्हायर्नमेंट लाईफ फाउंडेशन ही संस्था गेली अनेक वर्षे मॅंग्रोव्ह आणि किनारपट्टी स्वच्छ ठेवण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. मॅंग्रोव्ह हे पर्यावरण संतुलन राखण्यासाठी, जैवविविधतेचे संवर्धन करण्यासाठी तसेच किनारपट्टीचे संरक्षण करण्यासाठी अत्यंत महत्त्वाचे मानले जातात.

पर्यावरण संरक्षण ही प्रत्येक नागरिकाची सामूहिक जबाबदारी असल्याचे अधोरेखित केले.तसेच नागरिकांनी प्रत्यक्ष सहभागाबरोबरच सोशल मीडियाच्या माध्यमातून या उपक्रमाशी जोडावे, स्वच्छता, वृक्षारोपण आणि ऊर्जा बचतीच्या सवयी अंगीकाराव्यात असे आवाहन करण्यात आले.



## नेरुळमध्ये अनधिकृत बांधकामावर निष्कासन कारवाई

**नवी मुंबई : बातमीदार**

महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत मा. आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त डॉ. राहुल गेठे व उप आयुक्त (अतिक्रमण) डॉ. कैलास गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने नेरुळ विभागात अनधिकृत बांधकामावर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील नेरुळ विभागाअंतर्गत विजयमाला अ. भोसले, सेक्टर-१०, नेरुळ, नवी मुंबई या ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता आर.सी.सी. बांधकाम अनधिकृतरित्या चालू असल्याचे निर्दर्शनास आल्याने सदर अनधिकृत बांधकाम केल्याप्रकरणी नेरुळ विभाग कार्यालयाकडून दि.२६ फेब्रुवारी २०२६ रोजी नोटीस बजावण्यात आलेली होती.

तरी सदर नोटीसीला न जुमानता अनधिकृत बांधकाम सुरु असल्याने निदर्शनास आल्याने या अनधिकृत बांधकामावर नेरुळ विभाग कार्यालयामार्फत अनधिकृत बांधकाम निष्कासन मोहिमेचे आयोजन करुन अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.

सदर कारवाई सहा.आयुक्त व अतिक्रमण विभागातील कर्मचारी, ८ मजुर, २ गॅसकटर, २ ब्रेकरच्या सहाय्याने अतिक्रमण विभागाकडील पोलीस पथक समवेत सुरक्षारक्षक यांच्या मार्फत करण्यात आली आहे.



## भगवान महावीर स्वामींचे उद्बोधन: जगा आणि जगु द्या

भगवान महावीर स्वामी हे जैन धर्माचे २४ वे आणि अंतिम तीर्थंकर होते, ज्यांनी अहिंसा, सत्य आणि अपरिग्रह या तत्त्वांचा प्रसार केला. इ.स.पू. ६ व्या शतकात बिहारमधील कुंडलपुर येथे जन्मलेले महावीर, जे बालपणी 'वर्धमान' म्हणून ओळखले जात, त्यांनी आध्यात्मिक ज्ञानासाठी ३० व्या वर्षी गृहत्याग केला आणि जगाला शांततेचा संदेश दिला. आध्यात्मिक जागृतीचा प्रसार व आत्मकल्याण करण्यासाठी जैन दिक्षा घेऊन ते एक तपस्वी बनले. भगवान महावीर यांना बिहारमधील जृम्भिकाग्राम जवळ ऋजुपालिका नदीच्या काठावर, एका शाल वृक्षाखाली ४२ व्या वर्षी १२ वर्षांच्या कठोर तपश्चर्येनंतर केवलज्ञान (सर्वोच्च ज्ञान) प्राप्त झाले. त्यानंतर त्यांनी ३० वर्ष भारत भ्रमण करुन जैन धर्मांचा प्रचार-प्रसार केला. त्यांचे प्रथम समवशरण व दिव्यवाणी-उद्बोधन हे बिहार राज्यातील राजगृही येथे झाले. महाराष्ट्र राज्यांतील धाराशिव जिल्ह्यातील अतिशय क्षेत्र तेर येथे पण त्यांचे समवशरण आले होते.

वर्धमान (बालपणीचे), वीर, अतिवीर, सन्मती म्हणून ही ओळखले जाणारे, महावीर या नावाने ते जग प्रसिद्ध झालेत. त्यांचे वडिल राजा सिद्धार्थ आणि माता त्रिशला आहेत. आत्मज्ञान प्राप्त करून 'केवली' (सर्वज्ञ) बनले. अहिंसा परमो धर्मः (अहिंसा), सत्य, अस्तेय (चोरी न करणे), ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह (संपत्तीचा संग्रह न करणे) ही त्यांची मुख्य तत्त्वे होय. त्यांनी वयाच्या ७२ व्या वर्षी बिहारमधील पावापुरी येथे मोक्ष प्राप्त केला.



महावीर स्वामींनी सांगितले की, स्वतःच्या आत्म्याला ओळखा आणि कोणत्याही प्राण्याला दुखावू नका. (अहिंसा) त्यांच्या शिकवणीनुसार, "जगा आणि जगू द्या" हाच खरा मार्ग आहे. त्यांनी जैन धर्माचे पुनरुत्थान केले. त्यांनी पूर्व-वैदिक काळातील पूर्वीच्या तीर्थंकरांच्या आध्यात्मिक, दार्शनिक आणि नैतिक शिकवणींचा विस्तार केला.

भगवान महावीर केवल ज्ञान प्राप्त केल्यानंतर महावीरांनी असे शिकवले की अहिंसा, सत्य , अस्तेय ( चोरी न करणे), अपरिग्रह व ब्रह्मचर्य ही पंचमहाव्रते आध्यात्मिक मुक्तीसाठी आवश्यक आहेत. त्यांनी अनेकान्तवाद व स्याद्वाद यांचे सिद्धांत शिकवले. भगवान महावीर ध्यानधारणेच्या अवस्थेत व सिंहांकित चिन्हासह अशा त्यांच्या मूर्ती भारतातील जैन तीर्थक्षेत्री आढळून येतात. चैत्र शुद्ध त्रयोदशी हा त्यांचा जन्मदिवस महावीर जयंती म्हणून साजरा केला जातो.भगवान महावीर आणि गौतम बुद्ध यांचा काळ हा समकालीन असल्याचं मानलं जातं.इतकंच नव्हे तर गौतम बुद्ध यांच्याप्रमाणेच महावीर जैन यांचं मूळ गावसुद्धा बिहारच्या मगध प्रांतातीलच आहे . मात्र, हेर्मान याकोबी नामक जर्मन संशोधकाने जैन आगमांची प्राचीनता सिद्ध केली. त्यांनी जैन धर्म बौद्ध धर्माहून वेगळा असून त्यापेक्षाही प्राचीन कालखंडापासून हा आचरणात आणला जात होता, हे सप्रमाण सिद्ध केलं.

गौतम बुद्धांपूर्वी जैन धर्म अस्तित्वात होता, हे दाखविणारे अनेक उल्लेख बौद्ध व जैन वाङ्मयात आढळतात.खरं तर, गौतम बुद्ध आणि भगवान महावीर हे दोघेही ब्राह्मण वर्चवस्ववाद, कर्मकांड आणि वैदिक प्रथा यांच्याविरोधात उभ्या ठाकलेल्या आंदोलनांचे प्रणेते मानले जातात. महावीर आणि गौतम बुद्ध यांनी दोघांनीही अहिंसेला प्राधान्य दिलं होतं, मात्र असं असलं तरी इतर काही बाबींमध्ये दोन्ही धर्मात काही मूलभूत फरक असल्याचं दिसून येतं. उदाहरणार्थ, भगवान महावीरांचे जैन अनुयायी आत्मा आणि पुनर्जन्माचा सिद्धांत मान्य करतात. तर बौद्ध धर्मात आत्मा आणि पुनर्जन्माची संकल्पना नाकारण्यात आलेली आहे.

**-सुजित राजकुमार खोलापुरे, पनवेल**
**अध्यक्ष, अखिल भारतवर्षिय दिगंबर जैन श्रमण सेवासंघ मुंबई**

## ग्रामदेवतांच्या धार्मिक यात्रांची नवी मुंबईत लगबग

**नवी मुंबई : बातमीदार**

चैत्र महिन्यातील गुढीपाडवा साजरा झाल्यानंतर राज्यभर यात्रांचा हंगाम सुरू झाला असून, महाराष्ट्रात मानाची समजली जाणारी आगरी-कोळी बांधवांची आराध्य देवता आई एकविरा देवी यांच्या कार्ला येथील यात्रेनंतर नवी मुंबई परिसरातील ग्रामदेवतांच्या यात्रांना मोठ्या उत्साहात सुरुवात झाली आहे.



विशेषतः नवी मुंबईतील स्थानिक गावगावठाणांमध्ये कोळी-आगरी समाजासाठी या ग्रामदेवतांच्या यात्रा अत्यंत महत्त्वाच्या मानल्या जातात. ग्रामदेवता ही गावाची रक्षणकर्ती मानली जात असल्याने, या यात्रांमधून श्रद्धा, परंपरा आणि सांस्कृतिकतेचा सुंदर मिलाप दिसून येतो. यावेळी, ग्रामदेवता ही गावाची रक्षणकर्ती मानली जात असल्याने, या उत्सवाचे महत्व अधिक आहे.

प्रत्येक गावात यात्रेची चाहूल लागताच वातावरण भक्तीमय बनले असून, मंदिर परिसर रोषणाई, फुलांची सजावट आणि पारंपरिक तोरणांनी सजले आहेत. ढोल-ताशांच्या गजरात पालख्या काढल्या जात असून, विशेष पूजा-अर्चा, अभिषेक, होमहवन, भजन-कीर्तन, हरिनाम सप्ताह आदी धार्मिक कार्यक्रमांनी गावागावांत अध्यात्मिक वातावरण निर्माण झाला आहे.

शहरातील दिवाळे कोळी, शहाबाज गाव, करावे, दारावे, नेरुळ, जुईनगर, सारसोळे, शिरवणे, सानपाडा, वाशी, बोनकोडे, महापे गाव, कोपरखैराने, घणसोली, गोठीवली, ऐरोली, दिवा कोळीवाडा या गावांमध्ये आजही ग्रामदेवतेच्या जत्रेला विशेष महत्व आहे. तसेच या यात्रांच्या निमित्ताने विविध ठिकाणी स्थायिक झालेली नातेवाईक मंडळीही मोठ्या संख्येने आपल्या गावी येत आहेत. यामुळे, जुने संबंध दृढ होत असून, एकत्रित कुटुंब परंपरा आणि संस्कृती जपण्याची संधी या यात्रांमुळे मिळत आहे.

दरम्यान, यात्रांमुळे स्थानिक अर्थव्यवस्थेलाही मोठी चालना मिळत आहे. खेळणी, मिठाई, खाद्यपदार्थ, पूजा साहित्य तसेच विविध घरगुती वस्तूंच्या विक्रीत वाढ होत असून, फेरीवाले, लघुउद्योजक आणि व्यापाऱ्यांना चांगला आर्थिक लाभ होत आहे. एकूणच, चैत्रोत्सवातील या ग्रामदेवतांच्या यात्रा धार्मिक श्रद्धा, सामाजिक एकोपा आणि आर्थिक उन्नती यांचा सुंदर संगम ठरत असून, कोळी-आगरी समाजाच्या अखंडित परंपरेचे खऱ्याअर्थी जतन होत आहे.

पान १ वरुन

### लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सवानिमित्त रामपर्व सोहळा

लाईफ मेंबर रवींद्र भोईर, डी. बी. पाटील, संजीवनी म्हात्रे, कामोठे स्कुलच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, विलासराव लेंभे, शशिकला पाटील, सायली वडवलकर, प्रणिता गोळे, अपूर्व ठाकूर, आदित्य ठाकूर यांच्यासह आयोजक आणि पंचक्रोशीतील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. याशिवाय विविध मान्यवर, पदाधिकारी आणि रयत शिक्षण संस्थेचे सदस्यही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रामपर्व अंतर्गत विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी सादर झालेल्या नृत्य, संगीत, नाट्य आणि कलाविष्कारांनी उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमादरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला आणि त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक योगदानाची महती यावेळी विशद करण्यात आली. माजी विद्यार्थ्यांसह आजी विद्यार्थी आणि गव्हाण विद्यालयाच्या शिक्षकांनी देखील नृत्याविष्कार सादर करून लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातील काही महत्त्वाच्या प्रसंगाचे सादरीकरण केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या जीवनातील काही प्रसंगाच्या आठवणी सांगणाऱ्या त्यांच्या समकालीन व मित्रपरिवार आणि कुटुंबीय यांच्या प्रातिनिधिक मुलाखतींची ध्वनिचित्रफित यावेळी प्रदर्शित करण्यात आली.

यावेळी सर्व माजी विद्यार्थ्यांनी स्वतः आपल्या परीने कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सहभाग नोंदवला. यावेळी नृत्याविष्कार, नाट्यविष्कार, भजन आदी विविध बहारदार आणि रसिकांनी मंत्रमुग्ध करणाऱ्या कार्यक्रमांद्वारे कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी विद्यार्थी भाषण स्मित मोकल याने तर मानपत्र वाचन व सूत्रसंचालन सागर रंधवे व दर्शना माळी यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी स्थानिक स्कूल कमिटीचे पदाधिकारी, सहकारी, माजी विद्यार्थी आणि शिक्षकवर्ग यांनी परिश्रम घेतले. एकूणच रामपर्व हा सोहळा उत्साहात आणि संस्मरणीय वातावरणात पार पडला.

### रायगडातील एकही अंगणवाडी अंधारात राहणार नाही -राजिप अध्यक्ष वाकडीकर

जल जीवन मिशन, जलदुर्ग संवर्धन, सागरी पर्यटनाला चालना, ऐतिहासिक वारसा स्थळांचे सुशोभीकरण, आरोग्य अशा विविध विषयांवर मंचातील सदस्यांनी विचारलेल्या प्रश्नांवर मंगेश वाकडीकर यांनी अत्यंत अध्ययनपूर्ण उत्तर देत त्यांच्यातल्या अभ्यासू वृत्तीची चुणूक दाखवली. सल्लागार मंदार दोंदे यांनी प्रास्ताविक सादर केले तर सल्लागार तथा ज्येष्ठ पत्रकार माधव पाटील यांनी आपले मनोगतातून मंगेश वाकडीकर यांना शुभेच्छा दिल्या.

मंगेश वाकडीकर यांच्या समवेत संपन्न झालेल्या वार्तालाप कार्यक्रमाला ज्येष्ठ पत्रकार तथा सल्लागार माधव पाटील, अध्यक्ष राजेंद्र पाटील, सल्लागार विवेक पाटील, सल्लागार संजय कदम, सल्लागार मंदार दोंदे, सरचिटणीस हरेश साठे, उपसचिव राजू गाडे, निलेश सोनावणे, प्रवीण मोहोकर, लालचंद यादव, सुनील राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती.

## म्हसळ्यात एसटीचालकाच्या प्रसंगावधानामुळे अपघात टळला

**म्हसळा : प्रतिनिधी**

म्हसळा शहरात रविवारी दुपारी घडलेल्या एका धक्कादायक अपघातात दैव बलवत्तर ठरले आणि मोठी जीवितहानी टळली. तोराडीम्हसळा मार्गावर धावणारी एमएच १३ सीयू ६८९ क्रमांकाची एसटी बस वसंतराव नाईक कॉलेज तोराडी येथील फाट्यावर अपघातग्रस्त झाली, मात्र बस चालक सुर्यकांत मनोहर गारुळे (वय ४४, गाव लोहा, नांदेड) यांच्या प्रसंगावधानामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला.



साई चेक पोस्टवरून म्हसळ्याकडे येत असताना बस स्पीडब्रेकरजवळ पोहचली. त्याच वेळी रस्त्यालगतच्या दुकानांतून माल घेऊन एक टेंपो अचानक आणि बेसावधपणे राष्ट्रीय महामार्ग ओलांडत होता. परिस्थिती अतिशय गंभीर बनली असताना चालकाने टेंपोला थेट धडक न देता अत्यंत कुशलतेने बस रस्त्याच्या कडेला घेतली.

या धाडसी निर्णयामुळे टेंपो, जवळील मोटरसायकल रिपेअर व पंक्चर दुकान मोठ्या नुकसानीपासून वाचले. अपघातात एसटी बसचे आर्थिक नुकसान झाले असले तरी कोणतीही जीवितहानी झाली नाही, हीच मोठी दिलासादायक बाब ठरली. दरम्यान, सीसीटीव्हीमध्ये टेम्पाचालकाचा निष्काळजीपणा दिसत असल्याचे समोर आले आहे.

बस चालक मनोहर गारळे यांच्या सतर्कतेचे सर्वत्र कौतुक होत असून त्यांच्या सुरक्षित ड्रायव्हिंगमुळे अनेकांचे प्राण वाचल्याची भावना व्यक्त होत आहे. ‘लालपरी’च्या चालकाने दाखवलेल्या धैर्य आणि जबाबदारीमुळे एक मोठा अपघात केवळ थोडक्यात टळला.

# निवडक

## लॉक तोडून ऐवजाची चोरी

**पनवेल :** कंपनीचे लॉक तोडून चोराने आत मध्ये प्रवेश केला आणि ६५ हजार रुपयांच्या ऐवजांची चोरी केली. या प्रकरणी २६ मार्च रोजी तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. शिफा हेल्थकेअर प्रायव्हेट लिमिटेड तळोजा एमआयडीसी या कंपनीच्या दरवाजाचे लॉक तोडून चोरांनी आतमध्ये प्रवेश केला आणि औषधे बनवण्याचे व पॅकिंग करण्याचे मशीनचे स्पेअर पार्टचे बॉक्स, कॉपर केबल, कॉपर पाईप लाईन, कोपर कॉम्प्रेसरचे बॉक्स, आदी ऐवज चोरून नेला.

## सिमेंटच्या १२० बॅगांचा अपहार

**पनवेल :** ४४ हजार ८८० रुपयांच्या सिमेंटच्या १२० बॅगांचा अपहार केल्याप्रकरणी कळंबोली पोलीस ठाण्यात २६ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. ट्रक (एमएच ०५ जीए २९७३) वरील चालक इमाम हुसेन शेख याने कळंबोली येथील कंपनीमधून २४० सिमेंट बॅग लोड केल्या होत्या. त्या भांडुप, पश्चिम येथे खाली करावयाच्या होत्या. त्याने १२० सिमेंट बॅग खाली केल्याचे चलन पाठवले. त्यानंतर त्याने कळंबोली येथील पार्किंगमध्ये गाडी पार्क करून चावी कंपनीच्या ऑफिसमध्ये जमा करून निघून गेला. यावेळी गाडी तपासली असता १२० सिमेंटच्या बॅग सापडून आल्या नाहीत. इमाम शेख याच्याकडे विचारणा केली असता त्याने उडवाउडवीची उत्तरे दिली.

## महापुरुषांबद्दल अपशब्द, गुन्हा दाखल

गुन्हे

**पनवेल :** एकस हॅंडलवर महापुरुषांबद्दल अपशब्द वापरल्याप्रकरणी खारघर पोलीस ठाण्यात २७ मार्च रोजी अ‍ॅट्रॉसिटी अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला. २६ मार्च रोजी एक्स हॅण्डल अकाउंट वर महापुरुषांबद्दल अपशब्दांचा वापर केला असल्याचे दिसून आले. यावेळी या आक्षेपार्ह पोस्टची स्क्रीनशॉटची प्रिंट पोलीस ठाण्यात देण्यात आली. त्यानुसार अनोळखी व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला.

## खारघरमधून विवाहित बेपत्ता



**पनवेल :** राहत्या घरातून कोणास काही एक न सांगता घराबाहेर पडलेली एक विवाहित अद्याप घरी न परतल्याने ती हरवल्याची तक्रार खारघर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. मुस्कान तमजुल शेख (वय-२२ वर्ष) असे या विवाहितेचे नाव असून तिचा रंग-गोरा, उंची अंदाजे ५ फुट, केस काळे लांब, नाक-सरळ, डोळे-काळे, बांधा-सडपातळ, अंगात नेसुस लाल रंगाची कुर्ती व लाल रंगाचा सलवार, भाषा-मराठी, हिंदी बोलणारी व समजते. या महिलेबाबत कोणाला अधिक महिती असल्यास त्यांनी खारघर पोलीस ठाणे किंवा मपोहवा शीतल खुंटे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे दोन दिवस शिल्लक

## पनवेल महापालिकेचे नागरिकांना आवाहन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

मालमत्ता कर भरण्यासाठी ३१ मार्च ही शेवटची तारीख असून महापालिकेचा मालमत्ता कर भरण्याचे शेवटचे दोन दिवस शिल्लक राहीले आहेत. मालमत्ताधारकांनी आपला मालमत्ता कर लवकरात लवकर भरावा, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

दरम्यान, पनवेल महानगरपालिका हद्दीतील सन २०२५२०२६ या आर्थिक वर्षासाठी मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेने धडक मोहीम सुरू केली आहे. महापालिकेची दिनांक २९ मार्च २०२६ पर्यंत एकूण मागणी २२८९.७३ कोटी रुपये इतकी असून, दिनांक ०१एप्रिल २०२५ ते २९ मार्च २०२६ रोजी पर्यंत एकूण वसुली ६८२.५३ कोटी व शिल्लक १६०६.३२ कोटी आहे. थकित मालमत्ता कर वसुलीसाठी मालमत्ता कर विभागाकडून धडक मोहीम सुरू करण्यात आली आहे.






वसुली वाढविण्यासाठी १३ स्वतंत्र वसुली पथके कार्यरत करण्यात आली आहेत. थकबाकीदारांना प्रत्यक्ष भेट देऊन नोटीस वितरण व जप्ती (अटकावणी) कारवाई करण्यात येत आहे. २८ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आलेल्या कारवाईनुसार कामोठे, कळंबोली, खारघर, पनवेल, उपविभाग नावडे या नोडमध्ये एकूण १७१६ नोटिसा बजावण्यात आल्या असून १५७ अटकावणी कारवाया करण्यात आल्या आहेत.

महापालिकेच्या वतीने नागरिकांना प्रोत्साहन देण्यासाठी ऑनलाईन पद्धतीने मालमत्ता कर भरल्यास २% सवलत देण्यात येत आहे. नागरिकांनी panvelmc.org या संकेतस्थळावरून सहजपणे कर भरता येणार आहे. याशिवाय, नागरिकांच्या तक्रारींचे जलद निराकरण करण्यासाठी KARMITRA App व Panvel Connect App उपलब्ध करून देण्यात आल्याची माहिती उपायुक्त स्वरूप खारगे यांनी दिली आहे.

अटकावणीची कारवाई टाळण्यासाठी मालमत्ता कर धारकांनी वेळेत भरावा व महापालिकेच्या विकासकामांना सहकार्य करावे असे आवाहन पनवेल महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

# दुचाकी अपघातात चालकाचा मृत्यू; सहप्रवासी जखमी

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल खांदा कॉलनीकडून नवीन पनवेलच्या दिशेने जाणाऱ्या दुचाकीस्वाराचे वाहनावरील नियंत्रण सुटल्याने दुचाकी रस्ता दुभाजकाला धडकून झालेल्या अपघातात दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. तर मागे बसलेला सहप्रवासी गंभीर जखमी झाल्याची घटना नवीन पनवेल येथे घडली. खांदेश्वर पोलीस ठाण्यात याप्रकरणी स्कुटी चालकाविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून अधिक तपास करण्यात येत आहे.

याबाबतचे वृत्त असे की, गंगाराम विश्वकर्मा (वय ५०, रा. सेक्टर ५, नवीन पनवेल) असे या अपघातात मृत्यू झालेल्या दुचाकीस्वाराचे नाव असून ते नवीन पनवेल येथे राहत होते. गंगाराम हे त्यांच्या दुचाकीवरून राम भानसिंग कामी (वय ४२, सेक्टर ७, खांदा कॉलनी) यांना घेऊन जात होते. त्यांची दुचाकी खांदा कॉलनी येथील उड्डाणपूल उतरून पुढे आली असता गंगाराम यांचा वाहनावरील ताबा सुट ल्याने त्यांची दुचाकी रस्ता दुभाजकावर धडकून हा अपघात झाला.

या अपघातात गंगाराम व राम हे दोघेही जखमी झाले. त्यानंतर दोघांना वेगवेगळ्या रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले, मात्र गंभीर जखमी असलेल्या गंगाराम विश्वकर्मा यांचा काही वेळात मृत्यू झाला. तर राम कामी यांच्यावर उपचार सुरू आहेत. या अपघाताला गंगाराम विश्वकर्मा हे कारणीभूत असल्याने खांदेश्वर पोलिसांनी त्यांच्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सपोनि उत्तम घेगडमल करत आहेत.

# एआय आधारित कॅन्सर तपासणी शिबिरामुळे आरोग्य जनजागृतीला चालना -ममता म्हात्रे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका हद्दीत महिला व नागरिकांच्या आरोग्य सुरक्षेसाठी राबविण्यात आलेल्या मोफत सामान्य आरोग्य व स्तन कर्करोग तपासणी शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. "आज केलेली एक छोटी तपासणी, उद्याचे आयुष्य सुरक्षित करेल" या संदेशातून जनजागृती करत, स्मार्ट हेल्थ AI (कृत्रिम बुद्धिमत्ता) द्वारे हे शिबिर प्रभावीपणे पार पडले. यावेळी महिला व बालकल्याण समितीच्या माध्यमातून अशा उपक्रमांद्वारे नागरिकांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी पुढील काळातही विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचा विश्वास सभापती ममता म्हात्रे यांनी व्यक्त केला.



पनवेल महानगरपालिकेच्या सर्व १५ नागरी प्राथमिक आरोग्य केंद्रावरती सोमवार ते शनिवार सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत पुढील ३ महिन्यांपर्यंत ही मोहीम राबवली जात आहे. या शिबिरास पनवेल महानगरपालिकेच्या महिला व बालकल्याण समिती सभापती म्हणून ममताताई प्रितम म्हात्रे यांनी भेट देऊन प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी उपस्थित डॉक्टर, आरोग्य कर्मचारी व नागरिकांशी संवाद साधून शिबिरामधील सुविधांची माहिती घेतली व महिलांनी अशा तपासण्यांचा लाभ घ्यावा, असे आवाहन केले.

शिबिरामध्ये AI-आधारित स्तन कर्करोग तपासणी, रक्तदाब (बीपी) व रक्तातील साखर (शुगर) तपासणी तसेच इतर महत्त्वाच्या आरोग्य निर्देशकांची तपासणी करण्यात आली. विशेष म्हणजे, गर्भाशयमुख कर्करोगापासून संरक्षणासाठी मुलींसाठी एचपीव्ही लसीकरणाबाबतही जनजागृती करण्यात आली.

*"महिलांनी आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष न करता वेळोवेळी तपासणी करून घेणे अत्यंत आवश्यक आहे. लवकर निदान झाले तर अनेक गंभीर आजारांवर मात करता येते. पनवेल महानगरपालिकेच्या माध्यमातून प्रत्येक घरापर्यंत अशा आरोग्य सुविधा पोहोचवणे हे आमचे उद्दिष्ट असून, प्रत्येक महिला व कुटुंब निरोगी राहावे यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत."*

***-ममताताई प्रितम म्हात्रे,***
*सभापती महिला बालकल्याण समिती प.म.पा.*

यावेळी मुलींच्या आरोग्य रक्षणासाठी U-WIN डिजिटल प्लॅटफॉर्मवर नोंदणी करून एचपीव्ही लसीकरणाची सुविधा उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली.

# उरण विधानसभा मतदारसंघाच्या एसआयआरबाबतची विशेष बैठक



**उरण : वार्ताहर, प्रतिनिधी**

भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशांप्रमाणे महाराष्ट्र राज्यात एसआयआरचा कार्यक्रम राबविण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने सदर कार्यक्रमाच्या अंतिम टप्प्यातील पूर्वतयारीकरीता १९० उरण विधानसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या पनवेल तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांची विशेष प्रशिक्षणपर बैठक २९ मार्च २०२६ रोजी अपर तहसीलदार पनवेल यांच्या दालनात आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस १९० उरण विधानसभा मतदारसंघांतर्गत पनवेल तालुक्यातील मंडळ अधिकारी अमोल घरत यांच्यासमवेत अन्य मंडळ अधिकारी व तलाठी तसेच त्यांच्या अधिनस्त असलेले सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (BLO) उपस्थित होते.

प्रशिक्षण आविशकुमार सोनोने, मा. मतदार नोंदणी अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (भूसंपादन), मेट्रो सेंटर नं. १, उरण, डॉ . उद्धव कदम, मा. सहा. मतदार नोंदणी अधिकारी तथा तहसीलदार उरण यांच्या अध्यक्षतेखाली. ओमेय परब, तांत्रिक सहाय्यक, उरण तहसीलदार कार्यालय यांनी दिले. सदर प्रशिक्षणादरम्यान मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांना प्रत्यक्ष काम करत असताना उद्भवणाऱ्या समस्यांचे समाधानकारकरित्या निराकरण केले.

# उरण चारफाटा ते मुळेखंड फाटा स्वच्छता अभियान

**उरण : बातमीदार**

सद्गुरु माता सुदीक्षाजी महाराज यांच्या कृपाशिवादाने ग्रुप ग्रामपंचायत चाणजे व संत निरंकारी मंडल उरण सिटी यांच्या संयुक्त विद्यमाने स्वच्छता अभियान उरण चारफाटा ते मुळेखंड फाटा या ठिकाणी राबविण्यात आला.

यावेळी ग्रामपंचायतचे सरपंच अजय म्हात्रे यांनी सांगितले की, संत निरंकारी मंडळ हे फक्त अध्यात्मिक नसुन ते अनेक समाजोपयोगी उपक्रम राबवित असतात तसेच या समाजाला,तरुण पिढीला वाईट मार्गावर जाण्यापासुन परावर्तित करतात, निरंकारी मिशनचे मुखी समीर पाटील यांनी मिशनची पुस्तकें वाटप केली. या स्वच्छता अभियानासाठी रुपाली कोळी, रोशन मेश्राम, विकास शर्मा, संजय पारदे, कैलाश नाखवा, संजिवन रावळे, निरंकारी सेवादल भाई, बहनजी, करंजा येथील ज्येष्ठ नागरिक मंडल, सर्व ग्राम पंचायत कर्मचारी, ग्राम पंचायत सदस्य, सदस्या व इतर सज्जन उपस्थित होते, शेवटी मुखी समीर पाटील यांनी उपस्थित सर्वांचे आभार मानले.

मोठया प्रमाणात कचरा साफसफाई झाल्याने परिसर सुंदर व स्वच्छ दिसण्यास मदत झाली आहे. या स्वच्छता अभियान मुळे रोगराईला आळा बसला असून नागरिकांचे आरोग्य सुरक्षित राहण्यास मदत होणार आहे.



# घोसाळवाडी येथे श्रीराम नवमी मिरवणुक जल्लोषात साजरी



**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चैत्र नवरात्रीची सांगता आणि प्रभू श्रीरामाचा आगमनचा आनंद व्यक्त करण्यासाठी रसायनीतील घोसाळवाडी येथील हिरानंदानी फॉरच्युन सिटीत श्रीराम नवमी उत्सवानिमित्त मिरवणूक कार्यक्रमाची परिसरात सर्वत्र चर्चा सुरू असून हि मिरवणूक अ‍ॅटलास बिल्डींग, समर्थ निवास गेटपासून हिरानंदानी फॉरच्युन सिटीत काढण्यात आली.

यावेळी हिरानंदानी आंतरराष्ट्रीय बजरंग दलाचे अध्यक्ष दिनेश सुर्वे, उपाध्यक्ष समीर मोरे यांच्या उपस्थितीत ही मिरवणूक पार पडली. या मिरवणुकीत सोसायटी प्रमुख सुनिल, कैलास, तेजससिंग, बेनी आदी उपस्थित होते. त्याचप्रमाणे या मिरवणुकीत हिरानंदानी फॉरच्युन सिटीतील शेकडो श्री राम प्रभूचे भक्त सामील झाले होते.या मिरवणुकीत डिजेच्या तालावर रथात प्रभू श्रीराम, लक्ष्मण, सिता,हनूमान प्रतिकृती साकारली होती.

या मिरवणुकीला अनेक मान्यवरांनी भेट देऊन प्रभू श्रीराम चंद्राचे आशिर्वाद घेतले. तसेच ठिकठिकाणी पालखीतील प्रभू श्रीरामाचे औक्षण करून महिलांसह लहानथोरांनी आशीर्वाद घेतले.

# बहुगुणी, औषधी पांढरा कांदा उरण बाजारपेठेत दाखल

**उरण : वार्ताहर**

उन्हाळी हंगामात अलिबागमध्ये पिकणारा औषेधी गुणकारी पांढरा कांदा उरणच्या बाजारात विक्रीसाठी आला आहे. या कांद्याला बाजारात मागणी आहे.

यावर्षी कांद्याच्या एका माळेसाठी २०० ते ३५० रुपये दर आकारला जात आहे. या वाढत्या दरामुळे नागरिकांनी आवश्यक असून खरेदीत हात आखडता घेतला आहे. यात कांद्याच्या आकारा नुसार दर आकारला जात आहे. वाढत्या उष्णतेवर हा कांदा फायदेशीर असून यंदा चांगलाच भाव खात आहे. ३०० ते ३५० रुपयांना कांद्याच्या माळेची विक्री होत आहे. विशेष म्हणजे ग्राहक भाव न करता कांदा खरेदी करीत आहेत.



अलिबागच्या पांढऱ्या कांद्याला भौगोलिक मानांकन मिळाले आहे. त्यामुळे हा कांदा राज्यभर आणि देशात प्रसिद्ध झाला आहे. त्यामुळे रायगडमध्ये येणारे पर्यटक मोकळ्या हाताने परत जात नाहीत. हा गुणकारी औषधी कांदा जाताना घेऊन जात आहेत. अलिबाग-मुरूडमध्ये येणारे पर्यटक परतीच्या प्रवासासाठी अलिबाग-वडखळ मार्गाने मुंबई, पुण्याकडे निघताना सफेद कांद्याची माळ, कलिंगड, वालाच्या शेंगा, ताजी भाजी, औषधी कंदमुळे आवर्जून खरेदी करत आहे.

यात पांढऱ्या कांद्याला विशेष मागणी आहे अलिबाग तालुक्यातील तळवली, सागाव, मारुती, खंडाला, नेवली, कार्ला, मानीबुते आदी ठिकाणी कांद्याची लागवड केली जाते. यंदा कांद्याची माळ १५० ते ३०० रुपये दराने आम्ही विकतो असे नवखार-रेवस येथील पांढरे कांदे विक्रेती सुजाता अशोक पाटील यांनी सांगितले.

अलिबाग तालुक्यातील तळवली,सागाव, कृषी विभागाने पांढरा कांदा लावडीचे क्षेत्र वाढविण्यावर भर दिला असून या वर्षी लागवड क्षेत्र वाढले आहे. १५० ते १७५ रुपये माळ असा दर गेल्यावर्षी यावर्षी होता. दर वाढले आहेत. अलिबागचा पांढरा गुणकारी औषधी कांदा तयार झाला आहे. अलिबाग-वडखळ मार्गावर सध्या हा कांदा विक्रीसाठी उपलब्ध असून त्याला मागणी आहे. अलिबागच्या शेतात पिकविलेला सेंद्रिय पांढरा कांदा विक्रीसाठी आणत आहे. या कांद्याला चांगली मागणी आहे. ग्राहक भाव न करता कांदा विकत घेत आहे. उरणच्या बाजारात नाक्यावर मोठ्या प्रमाणात या कांद्याची विक्री केली जात आहे.

या पांढऱ्या कांद्याची बाजारात आवक वाढल्या नंतर कांद्याच्या दरात घट होण्याची शक्यता विक्रेत्यांनी दिली आहे. मात्र सद्या आवक कमी असल्याने दर वाढ झाली आहे.

**दरवर्षी आम्ही कांदा खरेदी करीत असतो. गुणकारी, औषधी कांदा असल्याने मागणीही जास्त असते.**

**-वंदना संजय भोईर**, उरण गृहिणी

# शिक्षकांसाठी एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा

## ज्ञान, साधना आणि सकारात्मकतेचा सुंदर संगम!

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

शिक्षकांसाठी तणाव व्यवस्थापन आणि सुस्थिती : एक योगिक दृष्टिकोन" या विषयावर आयोजित एक दिवसीय राज्यस्तरीय कार्यशाळा उत्साह, प्रेरणा आणि ज्ञानाच्या प्रकाशात अत्यंत यशस्वीरीत्या झाली.

आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ संचलित श्री. बापूसाहेब डी.डी. विसपुते शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नवीन पनवेल (IQAC अंतर्गत), चेंबूर सर्वंकष शिक्षणशास्त्र महाविद्यालय, चेंबूर आणि यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक (मुंबई विभागीय केंद्र) यांच्या संयुक्त विद्यमाने, संस्थेचे चेअरमन धनराज विसपुते व संचालिका संगीता विसपुते मॅडम यांच्या प्रेरणेतून तसेच प्राचार्या डॉ. सीमा कांबळे मॅडम यांच्या दूरदृष्टीपूर्ण मार्गदर्शनाखाली हा ज्ञानसोहळा साकारला.



डॉ. वामनजी नाखले सर यांचे मोलाचे सहकार्य लाभले, तर डॉ. चंद्रशेखर चक्रदेव सर यांनी आपल्या प्रभावी आणि ओजस्वी शैलीतून कार्यशाळेला एक वेगळेच उंची दिली. "मन करारे प्रसन्न, सर्व सिद्धीचे कारण" या अमूल्य उक्तीला साकार अर्थ देत, योगसाधनेच्या माध्यमातून मनःशांती, संतुलन आणि सकारात्मकतेचा मार्ग त्यांनी विद्यार्थ्यांसमोर उलगडला. योगप्रात्यक्षिकांच्या सजीव सादरीकरणातून प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात नवचैतन्याची ज्योत प्रज्वलित झाली.

कार्यक्रमास प्राचार्या डॉ. सीमा कांबळे मॅडम, उपप्राचार्य डॉ. विनायक लोहार, डॉ. नेहा म्हात्रे, डॉ. प्रीतेश वाढे, प्रा. निलेश अडसुळे, प्रा. राजू गायकवाड, प्रा. सुषमा संकपाळ तसेच सर्व शिक्षकेतर कर्मचारी आणि DSM अभ्यासक्रमाचे विद्यार्थी उत्स्फूर्त सहभागाने उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा.सुषमा संकपाळ यांनी समर्थपणे पार पाडले, तर आभार प्राचार्या डॉ. सीमा कांबळे यांनी मानले.

संपादकीय

# टेक कंपन्यांना अद्दल!

अमेरिकेत अलीकडेच एका तरुणीने सोशल मीडियाच्या व्यसनामागील कारणांच्या आधारे सोशल मीडिया बनवणाऱ्या बड्या टेक कंपन्यांना मोठी अद्दल घडवली. तेथील एका न्यायालयाने ‘मेटा प्लॅटफॉर्म्स’ व ‘युट्यूब’ला त्या तरुणीला ६० दशलक्ष डॉलरची नुकसानभरपाई देण्याचे आदेश नुकतेच दिले. वापरकर्त्यांना सोशल मीडियाचे व्यसन लागेल अशी सोशल मीडिया उत्पादने ‘मेटा प्लॅटफॉर्म्स’ व ‘युट्यूब’ने हेतुपुरस्सर डिझाइन केली आहेत असा आरोप या तरुणीने केला.

**आपण सोशल मीडिया वापरतो तेव्हा आपल्याला त्याचे व्यसन का लागते हे ‘डोपामाइन’चा अर्थ समजणाऱ्यांना कधीचेच कळून चुकले आहे. तरीही आज जगभरातील साडेतीन अब्जांहून अधिक लोक फेसबुक व इन्स्टाग्रामचा वापर करतात. हे ॲप्स मेटा कंपनीच्या मालकीचे आहेत. अमेरिकेतील मुलेमुलीही मोठ्या संख्येने फेसबुक, इन्स्टाग्राम व युट्यूबचा वापर करतात. मेटाकडून वापरकर्त्यांना व्यसन लागेल अशी सोशल मीडिया उत्पादने व मंच हेतुपुरस्सर तयार केले जातात असा आरोप अमेरिकेत अनेकदा केला गेला आहे. व्यसन लागेल असे प्रोडक्ट डिझाइन करण्यामुळे मुलांच्या मानसिक आरोग्यावर व खाण्यापिण्याच्या सवयींवरही परिणाम होतो असेही आरोप मेटा व युट्यूबवर अमेरिकेत सातत्याने झाले आहेत. यासंदर्भात इन्स्टाग्राम व युट्यूबविरोधात अनेक खटलेही अमेरिकेत दाखल आहेत. अखेर न्यायालयाने त्यातील एका प्रकरणावर सुनावणी केली. ‘केजीएम’ नावाच्या वीस वर्षीय तरुणीने दाखल केलेल्या याचिकेवर लॉस एंजेलिस येथील न्यायालयाने तिच्या बाजूने निकाल दिला. केजीएमने वयाच्या सहाव्या वर्षी युट्यूबचा तर नवव्या वर्षी इन्स्टाग्रामचा वापर सुरू केला होता. हे सोशल मीडिया प्लॅटफॉर्म व्यसन लागेल अशा पद्धतीने तयार केल्याने नैराश्य व तणाव येऊन आपल्याला बॉडी डिसमॉर्फिया झाल्याचे या तरुणीने न्यायालयाला सांगितले. सोशल मीडियाकडे एक उत्पादन म्हणून पहायला हवे. त्याच्या डिझाइनसंबंधी घटकांचा त्यादृष्टीने विचार करून जबाबदारीचे निकष त्यांना लागू करायला हवेत असे केजीएमने न्यायालयात म्हटले. या समाजमाध्यमांचे डिझाइन आपल्या मेंदूत ‘डोपामाइन’ तयार करते. जेव्हा आपल्याला यातून आनंद मिळतो, तेव्हा मेंदू डोपामाइन सोडतो. मग तो आनंद पुन्हा-पुन्हा घेण्याची इच्छा होते. ‘न संपणारे स्क्रोलिंग’ या त्यांच्या फीचरमुळे वापरकर्त्यांना व्यसन लागते. ‘मेटा’मधील एका माजी अभियंत्यानेच न्यायालयात हे सिद्ध करण्यात केजीएमची मदत केली. वापरकर्त्यांनी पोस्ट केलेल्या कंटेंटसाठी सोशल मीडियाला जबाबदार धरले जाणार नाही अशा कायद्यामुळे आजवर सोशल मीडियाविरोधातील प्रकरणे फेटाळली गेली होती. परंतु केजीएमने मात्र दावा वेगळ्या पद्धतीने मांडला. तिने मेटा व युट्यूबच्या प्रोडक्ट डिझाइन करण्यावर आक्षेप घेतला. त्यामुळे हे प्रकरण उत्पादनासंबंधीच्या जबाबदारीविषयक कायद्याच्या अखत्यारीत आले. आता नुकसान भरपाईपैकी ७० टक्के रक्कम मेटा प्लॅटफॉर्म्सला व ३० टक्के रक्कम युट्यूबला त्या तरुणीला द्यावी लागणार आहे. व्यसन लागेल अशा या उत्पादनांमुळे लहान मुले व तरुणाईच्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत असल्याचे निरीक्षण संबंधित न्यायालयाने नोंदवले आहे. एका प्रकरणातील भरपाई या कंपन्यांच्या दृष्टीने नगण्य असेल कदाचित. पण अशी अनेक प्रकरणे अमेरिकेतील न्यायालयांत दाखल आहेत. आणि जगभरातून असे दावे आले तर या कंपन्यांचे काय होईल? काही देशांनी मुलांनी सोशल मीडिया वापरण्यावर यापूर्वीच निर्बंध आणले आहेत. हा ताजा निकाल पाहता इतरही अनेक देश आता अशा निर्बंधांकडे वळण्याचा नक्कीच विचार करतील.**

# उपोषण किंवा आंदोलन केल्यानंतरच मार्ग निघतो तत्पूर्वी का नाही?





खबरबात
विजय मांडे

कर्जत तालुक्याची ओळख पूर्वी दिवडकरांचा बटाटावडा आणि जागतिक पर्यटन स्थळ माथेरान अशी होती. मात्र त्यानंतर धबधब्यांचे गाव अशी ओळख झाली. आता एज्युकेशनल हब म्हणून कर्जतची नव्याने ओळख होऊ लागली. खरे तर कर्जतकर नागरिक खूप दक्ष आहेत. उपोषण, आंदोलन, मोर्चा, मागणी निवेदन देण्यात कर्जतकरांचा हार्दिक हात कुणीही धरणार नाही. तालुक्यातील अनेक नागरिक, संस्था, राजकीय पक्ष, विविध मागण्यांसाठी संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना निवेदने देतात. त्यानंतर मुदतीत मागण्या पूर्ण न झाल्यास आंदोलने, मोर्चे, उपोषणे करतात. जिल्ह्यातील इतर तालुक्यांपेक्षा जास्त निवेदने, मोर्चे, उपोषणे, आंदोलने करणारे कर्जत तालुक्यात जास्त आहेत. आठवडयात एक तरी निवेदन संबंधित कार्यालयाला दिले जाते. हे जरी सत्य असले तरी उपोषण केल्यावर किंवा निवेदने दिल्यावर मार्ग निघतो पण तत्पूर्वी का नाही? असा प्रश्न सर्वसामान्यांना पडतो.

समाजाच्या समस्या सुटाव्यात किंवा वयक्तिक न्याय मिळावा यासाठी मोर्चा, साखळी उपोषण, आमरण उपोषण, आंदोलन, आत्मदहन आदी हत्यारे उचलली जातात. आता माहितीचा अधिकार हे देखील तीक्ष्ण हत्यार समाजसेवक अण्णा हजारे यांच्या पाठपुराव्याने आले आहे पण या हत्याराचा दुरुपयोग होताना दिसतो असो. कर्जतकर उपोषणाचा जास्तीत जास्त वापर करतात कारण त्याचा रिझल्ट हमखास व लवकर होतो. काहींनी दहा - अकरा तर काहींनी वीस - बावीस वेळा उपोषणे करून प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे उपोषण, आंदोलन करण्यात कर्जतकर 'अव्वल' आहेत.

१९८०च्या दशकात कर्जत ग्रुप ग्रामपंचायती साठी पळसदरी तलाव की पेज नदी मधून पाणी योजना असावी यासाठी झालेले उपोषण अनेकांच्या स्मरणात राहील असे होते. तत्कालीन आमदार तुकाराम सुर्वे यांचा आग्रह पेज नदी वर पाणी योजना करून कर्जत आणि १९ गावांची पाणी योजना करावी असा होता तर अनंत जोशी, रमेश चंदन आदींचा आग्रह रेल्वेच्या अखत्यारीत असलेल्या पळसदरी तलावाच्या पाण्यावर योजना करावी. म्हणून उपोषणाचे हत्यार वापरले होते. त्यावेळी कर्जत ग्रामपंचायतीसाठी पळसदरी तलावाच्या पाण्यावर योजना केली व दहिवलीसह १९ गावांसाठी पेज नदीच्या पाण्यावर योजना केली. त्यावेळी असलेल्या काँग्रेस सरकारने दोघांनाही खुश ठेवण्याचा प्रयत्न केला होता. माथेरान मध्ये एका आजारी असलेल्या जेष्ठ नागरिकाला दवाखान्यात जाण्यासाठी रुग्णवाहिका न दिल्याने त्यांच्या मुलाने उपोषण केले आणि त्या मुद्यावर निवडणुकीत तत्कालीन सत्ताधाऱ्यांना सत्तेपासून दूर रहावे लागले होते.

पेण अर्बन बँक बंद झाली आणि अनेक ठेवीदारांचे पैसे अडकले. त्यावेळी उपोषणे करण्यात आली. कारण सर्वात जास्त पैसे कर्जतकरांचे अडकले होते. ती उपोषणेही लक्षात ठेवण्यासारखी होती. कर्जतच्या उप जिल्हा रुग्णालयातील मनमानी विरुद्ध अनेकांनी उपोषणे केली होती. आरपीआय सारख्या राजकीय पक्षानेही उपोषण केले होते. यासाठी पत्रकारही मागे नव्हते. कर्जत तालुका मराठी पत्रकार संघानेही उपोषण केले होते. कर्जत चार फाटा ते भिसेगाव भागातील श्रद्धा हॉटेल आता बिकानेर पर्यंतचा रस्ता व्हावा यासाठीही उपोषण करावे लागले होते. एस. टी. आगारातील कर्मचाऱ्यांनी सुद्धा विविध मागण्यांसाठी उपोषणे केली होती. कर्जत शहरात 'ड' सत्ता प्रकारच्या जमिनी आहेत. त्यांची मुदत संपल्याने मोठा प्रश्न उभा राहिला होता. त्यावेळी अरुण गांगल यांच्या पुढाकाराने उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी तत्कालीन महसूलमंत्री अशोक चव्हाण यांनी तो प्रश्न सोडविला.

कोरोना काळाच्या आधी आणि नंतरही दहा - अकरा उपोषणे झाली. ॲड. कैलास मोरेंनी त्यासाठी पुढाकार घेतला होता. त्यातील बरीचशी यशस्वीही झाली. कुणी परस्पर जमिनी विकल्या म्हणून उपोषणे केली तर कुणी जागेतील अतिक्रमण काढावे म्हणून उपोषणे केली. एक उपोषण तर बरेच दिवस चालले. ते घरकुल मिळाले नाही म्हणून होते. पंचायत समितीच्या आवारात ते उपोषण होते. त्यानंतर ते अलिबागला जिल्हाधिकारी कार्यालयासमोर बरेच महिने होते. रेल्वेने जमिनी भूसंपादीत केल्या. त्यावेळी जास्त दर मिळावा म्हणून सुद्धा जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी त्याचे नेतृत्व ॲड. गोपाळ शेळके यांनी केले होते. इतकेच काय? कर्जतचे प्रवेशद्वार म्हणजे चारफाट्यावरील अतिक्रमण काढण्यासाठी नारी शक्ती संघटनेने ज्योती जाधव यांच्या नेतृत्वाखाली उपोषण केले होते. ते यशस्वी झाले. कर्जत ठेकेदार संघटनेनेही वारंवार उपोषणे केली होती. या उपोषणांसाठी राहुल डाळिंबकर, अशोक भोपतराव, उदय पाटील आदी पुढाकार घेत असत. नुकतेच ठेकेदार संघटनेने थकलेली बिले मिळण्यासाठी उपोषण केले. दुसऱ्याच दिवशी आमदार महेंद्र थोरवे यांची मध्यस्थी यशस्वी ठरली आणि एप्रिल मध्ये निधी उपलब्ध करून मिळणार असल्याने उपोषण स्थगित करण्यात आले. असे होते तर आधी निधी का मिळत नव्हता? हा सुद्धा एक प्रश्न उपस्थित होतो.

पोलीस मित्र संघटनेचे रमेश कदम म्हणजे उपोषणाचे 'किंग' च म्हणावे लागेल त्यांनी आत्तापर्यंत तब्बल वीसच्या वर उपोषणे केली आहेत. देवस्थान जमीन हडप केले प्रकरणी देवाच्या जमीनी देवाच्या नावे करण्यासाठी, बार्णे - साळोख रस्ता डांबरीकरण करण्यासाठी, महावितरण कंपनी गलथान कारभारात सुधारणा करण्यासाठी, सात बारा उताऱ्याचे 15 रुपये पैकी 5 रुपये शासनाचे शुल्क जमा करणेसाठी अशा अनेक विषयांचा समावेश आहे. सध्या ते रस्त्यांवर पडलेले खड्डे भरण्यासाठी खड्ड्यात बसून उपोषण करीत आहेत. त्यांच्या या आंदोलनाला चांगले यश मिळत असून संबंधित खात्यांच्या अधिकाऱ्यांची झोप उडाली आहे. कर्जत तालुक्यातील माथेरानच्या डोंगरामध्ये असलेल्या आदिवासी वाड्यांच्या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्यावर साकव बांधण्यात यावेत या मागणी साठी आदिवासी समाजाचे कार्यकर्ते जैतु पारधी यांनी उपोषण केले होते. साकव मंजूर करण्याचे आश्वासन दिल्यानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले होते. कर्जत इंग्लिश मिडीयम स्कुलच्या पालकांनीही शाळेच्या गलथान कारभाराविरुद्ध उपोषण केले होते. कर्जत तालुक्याचे टोक असलेल्या बडीस गावातील आदिवासींनी सुद्धा रस्त्यासाठी उपोषण केले होते. विजय हजारे यांनी देखील उपोषण करून अनेक समस्या मार्गी लावण्याचा प्रयत्न केला.

माजी आमदार सुरेश लाड यांनी सुद्धा रस्त्यांची कामे सुरू व्हावीत म्हणून आमदार असताना फेब्रुवारी २०१९ मध्ये उपोषण केले होते. लगेचच रस्त्याची कामे सुरू झाल्याने त्यांनी उपोषण मागे घेतले. लाड यांनी नगरपरिषदेच्या पायरीवर बसून तर पोलीस ठाण्याच्या पायरीवर झोपून ठिय्या आंदोलन केले होते. पळसदरी ग्रामपंचायत हद्दीतील निगुर्ले, तिघर, वरणे प्रास्तार कल्पतरू नावाची कंपनी विकासक म्हणून काम करीत आहे. तेथे स्थानिक युवकांना नोकऱ्या मिळाव्यात म्हणून ग्रामस्थांनी उपोषण केले होते. ते तब्बल चार दिवस चालले. कैलास म्हामले, अजित पवार हे युवक उपोषणास बसले होते. तीन दिवस झाले तरी न्याय मिळत नाही म्हणून 70 वर्षांच्या मनुबाई पवार यांच्यासह 14 महिला चौथ्या दिवशी उपोषणास बसल्या तेंव्हा प्रशासन हालले आणि मार्ग काढण्याच्या आश्वासनानंतर उपोषण स्थगित करण्यात आले.



## बदलते तंत्रज्ञान

### इन्स्टाग्राम रील्समध्ये असा द्या व्हॉईस ओव्हर

जर तुम्ही इन्स्ट्राग्रामवर नव्यानेच रील, व्हिडिओ बनवण्यास सुरुवात केली असेल तर याठिकाणी रील व्हिडिओमध्ये, तुम्ही म्युजिक आणि साउंड इफेक्टसह




तुमचा व्हॉइस ओव्हर देऊ शकता तुम्ही म्युझिक आणि साउंड इफेक्टसह तुमचा व्हॉइस ओव्हर देऊ शकता. विशेष बाब म्हणजे रील व्हिडिओवर व्हॉईस ओव्हर देण्यासाठी तुम्हाला कोणत्याही थर्ड पार्टी पचा सहारा घ्यावा लागणार नाही. खपींरसीरा ठशशश्री व्हिडिओंमध्ये व्हॉईस ओव्हर रेकॉर्ड करण्यासाठी ॲपमधील सपोर्ट प्रदान केला जातो. यासाठी तुम्हाला काही सोप्या स्टेप्स फॉलो करायच्या आहेत.

सर्वप्रथम तुमच्या स्मार्टफोनमध्ये Instagram App.उघडा. यानंतर खालच्या पट्टीवर दिसणाऱ्या + आयकॉनवर क्लिक करा. + आयकॉनवर क्लिक केल्यानंतर तुमच्यासमोर चार पर्याय दिसतील, ज्यामध्ये पोस्ट, स्टोरी, रील आणि लाईव्हचे पर्याय असतील. आता तुम्हाला Reels पर्यायावर क्लिक करावे लागेल. आता कॅमेरा स्टार्स करा आणि तुमची रील तयार करा. रील रेकॉर्ड केल्यानंतर, तुम्हाला तुमच्या रीलच्या कोपऱ्यात म्युझिक आयकॉन दिसेल. या चिन्हावर क्लिक करा. म्युझिक आयकॉनवर क्लिक केल्यानंतर तुम्हाला खाली काही पर्याय दिसतील, ज्यामध्ये म्युझिक, व्हॉईस ओव्हर आणि साउंड इफेक्ट इ. पर्याय असतील. तुम्हाला या तीनपैकी व्हॉईस ओव्हर पर्यायावर क्लिक करावे लागेल. यानंतर तुम्ही रील व्हिडिओसाठी तुमचा आवाज देऊ शकता. व्हॉईस ओव्हर दिल्यानंतर शेअर बटणावर क्लिक करून तुमची रील इंस्टाग्रामवर शेअर करा.

अलीकडे इन्स्टाग्रामवर एकाच वेळी अनेक फिचर्स जोडण्यात आले आहेत. या फीचर्सच्या आधारे आता आपण इन्स्ट्राग्रामवर गेम देखील खेळू शकता. जाणून घेऊया यासाठीच्या सोप्या स्टेप्स. इन्स्ट्राग्राम आपल्या युजर्सना DM मध्ये गेम खेळण्याची सुविधा देते. यावर तुम्ही एक ’झेपस’ गेम खेळू शकता. यासाठी कुठल्याही DM चॅटमध्ये जाऊन एक इमोजी सिलेक्ट करा. आता त्या ईमोजीवर टॅब करताच एक नवीन स्क्रीन ओपन होईल. स्क्रीनवर ईमोजी एका बॉल स्वरूपात दिसेल. स्क्रीनच्या खाली एक स्लायडर असेल त्याला तुम्ही मूव्ह करून खेळू शकता. स्लायडर सतत मूव्ह करत तुम्हाला स्माईली स्क्रीनवर खाली टच होण्यापासून वाचवायचा असतो.

# प्रसिद्ध गीतकार, कवी आनंद बक्षी



निमित्त

आनंद बक्षी हे एक हिंदी गीतकार व कवी होते. बक्षी यांचा जन्म २१ जुलै १९३० रोजी आताच्या पाकिस्तानमधील रावळपिंडी येथे काश्मीरी मोहयाल ब्राह्मण कुटुंबात झाला. त्यांची आई सुमित्रा आनंद बक्षी ते पाच वर्षांचे असताना वारली. त्यांचे कुटुंब भारताच्या फाळणी दरम्यान २ ऑक्टोबर, १९४७ रोजी भारतात आले. डकोटा विमानातून दिल्लीला आल्यावर बक्षी कुटुंब पुणे, मेरठ आणि शेवटी परत दिल्लीत येऊन स्थायिक झाले.


कविता हा त्यांचा जीव की प्राण. त्यांचे विश्वच निराळे. शब्दांच्या मळ्यात फिरणारे. त्यात त्यांच्या वाट्याला आली लष्करातली नोकरी. लष्कराच्या कडक शिस्तीत शब्दांना अधिकच साचेबद्धता आली. ते रुक्ष वातावरण, तो युद्धाचा सराव, लष्करी कवायत अशा वातावरणात हा शब्दप्रभू कवितेच्या मळ्यात खुशाल बागडायचा. अंगच्या प्रतिभेने रुपेरी पडद्याच्या दालनात त्यांनी प्रवेश केला. त्यांनी रसिकांना जिंकले. कारण त्यांच्या शब्दांची जादूच तशी होती. त्यांच्या लेखणीतून उतरलेल्या गीतांनी तरुणाईला झिंग आणली. त्यांच्यातील कविमनाने गायकीवर मात केली. ते गीतकार बनले आणि जन्माला आली तुमचे-आमचे जीवन फुलवणारी, अविस्मरणीय गाणी.

शब्दांच्या या जादुगाराने आपल्या गीतांनी रसिकांना जणू मोहिनीच घातली. प्रेमाची ओढ असो की विरह, आई-मुलातील वात्सल्य असो की मरणाची अपरिहार्यता असो, आनंद बक्षींच्या लेखणीने या सर्व भावना रसिकांच्या मनी ठसायच्या. १९५८ मध्ये आलेला ‘भला आदमी’ हा गीतकार आनंद बक्षींचा पहिला चित्रपट. ‘धरती के लाल न कर इतना मलाल’ हे त्यांचे पहिले गाणे. आनंद बक्षी प्रकाशझोतात आले ते ‘जब जब फूल खिले’च्या गीतांमुळे. या चित्रपटात त्यांची लेखणी अशी खुलली की तिने रसिकांची मने काबीज केली. ‘ये समा, समा है ये प्यार का’ हे यातले लताच्या आवाजातले गाणे आजही ताजे, टवटवीत वाटते.

सहज ओठांवर येतील असे साधे, आशयघन शब्द, मनाला भावणाऱ्या शब्दांची यमकालंकारात केलेली सहज-सोपी गुंफण ही आनंद बक्षींच्या गाण्यांची वैशिष्ट्ये. रसिकांच्या मनातले भाव नेमकेपणाने त्यांच्या गीतांत उतरायचे. मैत्री असो की द्वेष, प्रेम असो की मत्सर, वासल्य असो की कारुण्य, जीवनाचे तत्त्वज्ञान असो की फँटसी, आनंद बक्षींची लेखणी हे सारे भावविश्व चपखलपणे टिपायची. या सर्व भावना मग सुंदर गीतातून रसिकांच्या मनात रुंजी घालायच्या.

या त्रयीने अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. आने से उसके आये बहार (जीने की राह), बिंदिया चमकेगी (दो रास्ते), सावन का महीना (मिलन), मैं शायर तो नहीं (बॉबी), परदा है परदा (अमर अकबर अँथोनी), आदमी मुसाफिर है (अपनापन), डफलीवाले (सरगम), ओम शांती ओम (कर्ज) ही आनंद बक्षी-लक्ष्मी-प्यारे या त्रयींची काही सुपरहिट गाणी. लक्ष्मी-प्यारे यांच्याप्रमाणेच राहुलदेव बर्मन (आरडी) यांच्याबरोबरही आनंद बक्षी यांचे सूर जुळले. ना कोई उमंग है (कटी पतंग), रैना बीती जाए (अमर प्रेम), महेबूबा महेबूबा (शोले), परबत के पीछे (महेबूबा), कल्याणजी-आनंदजी, अन्नु मलिक, राजेश रोशन या संगीतकारांसाठीही आनंद बक्षी यांनी अनेक अविस्मरणीय गाणी दिली आहेत. अशा या महान गीतकाराचे ३० मार्च २००२ रोजी निधन झाले. (साभार : इंटरनेट )

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

### ‘या’ पदार्थांचा जेवणात वापर करून आजारांना करा हद्दपार

बदलत्या जीवनशैलीत फिटनेस चांगला राखणं हे सर्वात महत्त्वाचं काम आहे. स्थूलता, लठ्ठपणा, उच्च- रक्तदाब, हृदयविकार, मधुमेह, प्रतिकार शक्ती कमी असल्यामुळं होणारे आजार, पचनसंस्थेचे आजार, कॅन्सर या आजारांचं प्रमाण वाढत आहे. या सर्व आजारांचा प्रतिकार करण्यासाठी, त्यांना रोखण्यासाठी आपल्या देशातील पारंपारिक तृणधान्यं आणि भरडधान्य (मिलेट) उपयोगाची आहेत, असं मत पुण्यातील या विषयाच्या अभ्यासक संगिता संजय कुमार यांनी दिलं आहे. त्यांनी याबाबत काही महत्त्वाच्या टिप्सही दिल्यात.



मिलेट हा प्राचीन धान्याचा एक प्रकार आहे. जो दोन प्रकारच्या धान्यांपासून बनविला जातो. अनेकांना मिलेट म्हंटलं की बाजरीची आठवण येते. हा मिलेटमधील सर्वात लोकप्रिय प्रकार आहे. भारत, नायजेरिया मिलेट चा संबंध बाजरीचा असल्याचा आठवतो, जो मिलेट मध्ये सर्वात लोकप्रिय आहे.मिलेट हे भारतसह आशियाई आणि आफ्रिकन देशांमध्ये याचं उत्पादन होतं.

बाजरीचे धान्य रक्तदाब कमी करू शकते आणि गॅस्ट्रिक अल्सर आणि पोटाचा कर्करोग टाळू शकते. बाजरी बद्धकोष्ठता, सूज आणि लठ्ठपणा कमी करण्यास देखील मदत करू शकते मिलेट हे एक पौष्टिक पीक आहे, डोंगराळ, किनारी, पावसावर अवलंबून आणि कोरड्या भागात त्याचे उत्पादन घेता येते. जमिनीची मर्यादित सुपीकता किंवा वनस्पतींची वाढ टिकवून ठेवण्याची मातीची क्षमता आणि जमिनीतील ओलाव्याची श्रेणी लक्षात घेऊन ही धान्ये त्यात सहज उगवतात. ज्यात भरड आणि सूक्ष्म धान्यांचा समावेश केला जातो. बाजरीसह नाचणी, बाजरी, झांगोरा, ज्वारी, कोडो, बेरी, चेना, कांगणी, कुटकी, मूग, इतर धान्यांचाही मिलेटमध्ये समावेश होतो, अशी माहिती संगिता यांनी दिली.

मिलेट्सचे मुख्य प्रकार कोडो मिलेट्स (कोद्रा) हा एक महत्तावाचा औषधी पदार्थ आहे. हे अँटिऑक्सिडंट्सचे उत्कृष्ट स्त्रोत आहे. रक्तातल्या साखरेची पातळी नियंत्रित करण्याच्या क्षमतेसाठी हे ओळखले जाते. कोडो मिलेट्सला सौम्य, मातीची चव असते आणि ती उपमा आणि खिचडीसह विविध पदार्थांमध्ये वापरली जाऊ शकते. मिलेट्स म्हणजे भरड धान्यामध्ये पोषकतत्वेमुबलप्रमाणातआढळतात. ते फायबरने समृद्ध असतात आणि त्यात व्हिटॅमिन ए, व्हिटॅमिन बी कॉम्प्लेक्स, फॉस्फरस, पोटॅशियम, लोह, तांबे आणि मॅग्नेशियम हे धान्य रक्तपेशी बनवण्यातही मदत करतात

# ई-गव्हर्नन्समध्ये नवी मुंबई मनपाची झेप

## राज्यात १५० दिवसांच्या मूल्यमापनात चौथा क्रमांक

**नवी मुंबई : बातमीदार**

डिजिटल प्रशासन आणि नागरिकाभिमुख सेवांच्या अंमलबजावणीत सातत्य राखत नवी मुंबई महानगरपालिकेने राज्यात आपली छाप कायम ठेवली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतील १५० दिवसांच्या ई-गव्हर्नन्स प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमाच्या राज्यस्तरीय मूल्यमापनात मनपाने २९ महानगरपालिकांमध्ये चौथा क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी नोंदवली.

मुंबईतील सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी मनपाच्या वतीने प्रशस्तिपत्र स्वीकारले. माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार, मुख्य सचिव राजेश अग्रवाल आदी यावेळी उपस्थित होते. "ई-गव्हर्नन्स सुधारणा कार्यक्रमांतर्गत उत्कृष्ट कार्याबद्दल गौरव" असा उल्लेख असलेले हे प्रशस्तिपत्र महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे व त्यांच्या पथकाला प्रदान करण्यात आले.

यापूर्वी १०० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणा कार्यक्रमात तिसरा क्रमांक



मिळवलेल्या मनपाने यंदा पुन्हा एकदा प्रभावी कामगिरी करत अव्वल गटात स्थान कायम ठेवले आहे. गेल्या वर्षभरात नागरिकांना जास्तीत जास्त सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. करभरणा, जन्म-मृत्यू दाखले, विविध परवाने, तक्रार नोंदणी व माहिती मिळविणे या सेवा संकेतस्थळ, 'माय एनएमएमसी' ॲप, 'आपले सरकार' पोर्टल तसेच व्हॉट्सॲप चॅटबॉटद्वारे उपलब्ध करण्यात आल्या आहेत.

**सेवा वितरणात गती, पारदर्शकतेत वाढ**

'आपले सरकार' उपक्रमांतर्गत ६८ लोकसेवा आणि मनपाच्या ३९ सेवा ऑनलाईन उपलब्ध करून देण्यात आल्या असून सेवा वितरणाचा कालावधी कमी करण्यासाठी प्रक्रियेत सुधारणा करण्यात आली आहे. तक्रार निवारणासाठी सक्षम यंत्रणा उभारल्याने नागरिकांच्या समस्यांचे वेळेत निराकरण होत असल्याचे मूल्यमापनात नमूद करण्यात आले.

**ई-ऑफिस व डॅशबोर्डमुळे निर्णयप्रक्रिया सक्षम**

राष्ट्रीय माहिती विज्ञान केंद्र (NIC) विकसित ई-ऑफिस प्रणालीचा वापर एक हजारांहून अधिक अधिकारी व कर्मचारी करत असून त्यामुळे कामकाजात वेग आणि पारदर्शकता वाढली आहे. तसेच प्रशासकीय निर्णय प्रक्रियेसाठी विकसित करण्यात आलेल्या डॅशबोर्डमुळे विविध विभागांची माहिती एकाच ठिकाणी उपलब्ध होत असून रिअल-टाईम माहितीच्या आधारे निर्णय घेणे सुलभ झाले आहे.

**एआय, ब्लॉकचेन व GIS चा प्रभावी वापर**

नागरिकांच्या तक्रारींचे जलद वर्गीकरण व निवारण करण्यासाठी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आधारित प्रणालीचा वापर करण्यात येत आहे. शाळा सोडल्याचा दाखला देण्यासाठी ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून दस्तऐवजांची सुरक्षितता व पारदर्शकता वाढविण्यात आली आहे. याशिवाय १५० हून अधिक GIS लेयर्स विकसित करून घनकचरा व्यवस्थापन, वाहन ट्रॅकिंग तसेच हवामान बदलाच्या संभाव्य परिणामांचे विश्लेषण करण्यात येत आहे.

दरम्यान, या यशाबद्दल नवी मुंबईकरांचे अभिनंदन करत पुढील काळात अधिक सुलभ, जलद व दर्जेदार सेवा देण्यासाठी डिजिटल माध्यमांतून नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचा मानस असल्याचे अतिरिक्त आयुक्त सुनील पवार यांनी सांगितले.

# शाळांमध्ये मराठी-इंग्रजी दोन्ही माध्यमे सुरू ठेवा -आमदार मंदा म्हात्रे

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

महापालिकेच्या मराठी शाळांना इंग्रजी माध्यमात रूपांतर करण्याच्या धोरणावरून शहरात सुरू असलेल्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर आमदार मंदा म्हात्रे यांनी संतुलित धोरणाची मागणी केली आहे. मराठी शाळा बंद करण्याऐवजी त्या अधिक सक्षम करत मराठी व इंग्रजी या दोन्ही माध्यमांच्या शाळा सुरू ठेवाव्यात, अशी आग्रही भूमिका त्यांनी महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांना पाठविलेल्या पत्रातून मांडली आहे.

नवी मुंबई महापालिकेच्या मराठी शाळांचे इंग्रजी माध्यमात रूपांतर करण्याचा निर्णय घेण्याच्या तयारीत सत्ताधारी असतानाच त्यावर समाजातील विविध स्तरातून मते मांडली जात असून, या निर्णयाला समर्थनाबरोबरच विरोधही होत आहे. या पार्श्वभूमीवर आ. मंदा म्हात्रे यांनी आयुक्तांना पत्र पाठवून विविध सूचना केल्या आहेत. मराठी शिक्षणाबरोबरच दर्जेदार इंग्रजी शिक्षण देणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले असून,

### आयुक्तांकडे आग्रही मागणी

मराठी शाळा बंद न करता दोन्ही माध्यमांची शैक्षणिक व्यवस्था कायम ठेवावी, असे त्यांनी पत्रात नमूद केले आहे.

मराठी माध्यमाच्या शाळांमधून अधिक चांगल्या प्रतीचे शिक्षण दिल्यास त्या बंद करण्याची वेळ येणार नाही, असे त्यांनी पत्रात अधोरेखित केले आहे. इंग्रजी माध्यमाचा विस्तार करताना आवश्यक प्रशिक्षित शिक्षक व कर्मचाऱ्यांची उपलब्धता हा मोठा प्रश्न निर्माण होऊ शकतो, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. सध्या महापालिकेच्या सीबीएसई शाळांमध्येही शिक्षकांची कमतरता जाणवत असून, काही शाळा मनुष्यबळाअभावी अडचणीत असल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली.

इंग्रजी शिक्षणाची गुणवत्ता वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. मुंबईतील काही नामांकित मराठी शाळांप्रमाणे इंग्रजी विषयासाठी अतिरिक्त वर्ग सुरू करण्याची योजना महापालिकेने राबवावी, अशी सूचना त्यांनी केली. तसेच इंग्रजी माध्यमासाठी नियुक्त होणारे शिक्षक उच्च दर्जाचे व किमान पाच वर्षांचा अनुभव असलेले असावेत, अशी अटही त्यांनी मांडली आहे.

दरम्यान, समाजमाध्यमांवरूनही आ. मंदा म्हात्रे यांनी मराठी शाळा बंद करणे हा उपाय नसून त्या अधिक सक्षम करणे आवश्यक असल्याची भूमिका व्यक्त केली आहे. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी मराठी व इंग्रजी या दोन्ही भाषांचा समतोल साधणारे धोरण स्वीकारणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

या मुद्द्यावर मनसे कडूनही तीव्र विरोध नोंदविण्यात आला असून, सर्व मराठी शाळांचे एकाचवेळी इंग्रजीकरण करण्याच्या निर्णयावर पुनर्विचार करण्याची मागणी करण्यात आली आहे. अभ्यासपूर्वक व टप्प्याटप्प्याने निर्णय घ्यावा, अन्यथा आंदोलन छेडण्याचा इशाराही मनसेने दिला आहे.

# भगवान महावीर जयंतीच्या दिवशी मांसविक्री केंद्र बंद ठेवण्याबाबत निवेदन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त त्या दिवशी पनवेल महानगर पालिका क्षेत्रातील कत्तलखाने, मांसविक्री केन्द्र व हिंसात्मक क्रीया बंद ठेवण्याबाबत २७ मार्च रोजी पनवेल चे महापौर नितीन पाटील, उपमहापौर प्रमिला पाटील यांना निवेदन देण्यात आले व याविषयांवर तत्काल उचित कार्रवाई करण्याची मागणी अखिल भारतवर्षिय दिगंबर जैन श्रमण सेवासंघ तर्फे श्री सुजित राजकुमार खोलापुरे यांनी केली.

असेच निवेदन मा. आयुक्त व उपायुक्त परवाना विभाग- विभुते



यांना पण देण्यात आले. पनवेल महानगर पालिका क्षेत्रामध्ये तीन दिगंबर जैन समाजाचे भव्य जैन मंदिर (नविन पनवेल, खारघर व उलवे) असुन शेकडो भाविक या परिसरात वास्तव्यास आहेत. नवीन पनवेल येथील श्री मुनिसुव्रतनाथ दिगंबर जैन मंदिरातुन सकाळी ७:३० वाजता भव्य शोभायात्रा, जुलुस निघणार आहे.

मांसविक्री बंद ठेऊन महानगर पालिकातर्फे अहिंसेचे अवतार भगवान महावीर स्वामींना हीच खरी विनयांजली असेल असे खोलापुरे यांचे म्हणने आहेत व त्यांना प्रशासन तर्फे पुर्ण सहकार्य मिळेल असे उपायुक्त श्री विभुते यांनी सांगितले. त्याचप्रमाणे पालिका प्रशासन तर्फे भ. महावीर यांचे विचार/ उद्‌बोधन यांचा प्रचार प्रसार मुख्य आठ-दहा ठिकाणी लावुन करण्यात यावा, अशी देखील मागणी सकल जैन समाजाच्या वतीने खोलापुरे यांनी केली आहेत.

# सानपाड्यात सेंट्रल लायब्ररी उभारणीला वेग

### माजी नगरसेवक निलेश म्हात्रे यांची पाहणी

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर विधानसभा मतदारसंघाच्या आमदार मंदाताई म्हात्रे यांच्या संकल्पनेतून सानपाडा येथे उभारण्यात येणाऱ्या सेंट्रल लायब्ररीच्या कामाची पाहणी माजी नगरसेवक तथा भाजप महामंत्री निलेश म्हात्रे यांनी शनिवारी केली. सानपाडा सेक्टर-११, भूखंड क्रमांक १ येथे सुरू असलेल्या या प्रकल्पाची पाहणी स्थानिक कार्यकर्त्यांसह करण्यात आली.

नवी मुंबईसारख्या सुनियोजित शहरात सर्व सुविधा उपलब्ध होत असताना सानपाडा परिसरात मध्यवर्ती ग्रंथालयाची गरज लक्षात घेऊन हा प्रकल्प हाती घेण्यात आला आहे. सिडकोच्या १७७०.७३



चौ.मी. जागेवर नवी मुंबई महानगरपालिका मार्फत ही सेंट्रल लायब्ररी उभारली जात आहे. सदर इमारत बेसमेंट, तळमजला आणि चार मजली असणार आहे.

**काय असणारा लायब्ररीमध्ये**

या लायब्ररीमध्ये पारंपरिक पुस्तकांसोबतच ऑडिओ बुक्स, ई-लायब्ररी सुविधा, पर्यावरणपूरक ग्रीन बिल्डिंग संकल्पना, रॅम्पवरील व्ह्यूइंग गॅलरी, पुस्तकांचा प्रवास दर्शविणारे प्रदर्शन, लँग्वेज लॅब, तसेच १३० आसन क्षमतेचे अत्याधुनिक सभागृह उभारण्यात येणार आहे. विशेष म्हणजे दृष्टीहीन वाचकांसाठी ब्रेल विभागाचीही सोय करण्यात येणार असून मराठी, हिंदी, इंग्रजीसह विविध भाषांतील साहित्य उपलब्ध होणार आहे.

सानपाडा हा कॉस्मोपॉलिटन भाग असल्याने येथे सेंट्रल लायब्ररीची आवश्यकता होती. आमदार मंदाताई म्हात्रे या सातत्याने विकासकामांवर लक्ष ठेवून असल्याचे निलेश म्हात्रे यांनी सांगितले. तसेच या लायब्ररीचे काम अंतिम टप्प्यात असून लवकरच राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते लोकार्पण होणार असल्याची माहिती त्यांनी दिली. या प्रकल्पामुळे स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसह वाचनप्रेमींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

यावेळी भाजप वाशी मंडळ अध्यक्ष विकास सोरटे, समाजसेवक पांडुरंग आमले, चिंतामण बेल्हेकर, रुपेश मढवी, अशोक विधाते, श्रीपाद पत्की, श्रीकांत पत्की, विश्वास बोराडे, प्रणय मढवी, सुधीर अंग्रे, मनोज भोईर, मंगेश चव्हाण, जयंत पाटील, सुमेध साळवे, महेंद्र नाईक, प्रवीण भगत तसेच नवी मुंबई महानगरपालिकेचे अधिकारी, अभियंते आणि स्थानिक नागरिक उपस्थित होते.

# श्री रामजी संस्थानच्या रामनवमी उत्सवाची सांगता

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रामजी संस्थान, आपटे येथील श्रीरामनवमी उत्सवाची सांगता झाली. संस्थानचे हे १४५ वे वर्ष आहे. गुढिपाडव्याला या उत्सवाला प्रारंभ होवून दशमीच्या दिवशी ललिताच्या कीर्तनाने उत्सवाची सांगता झाली.

उत्सवकाळात रामपंचायतनाची नित्य पंचामृती पूजा, पवमान अभिषेक, रामयाग, रामनाम जप, काकडआरती, मंत्रपुष्प, दीपोत्सव आणि सीतामाईचे हळदीकुंकू या धार्मिक कार्यक्रमांबरोबरच गायन, नृत्य, लहान मुलांचे विविध कलागुणदर्शन, नाटक आदी सांस्कृतिक कार्यक्रम झाले.

या महोत्सवामधे युवा कीर्तनकार वर्षा रानडे-सहस्त्रबुद्धे यांची रामजन्म, तसेच ललित आदी प्रकारची तीन सुश्राव्य कीर्तने संपन्न झाली. चंद्रकांत मने यांनी संवादिनी व शार्दूल डोंगरे यांनी तबलासाथ केली. सायंकाळी पालखी सोहळा झाला.



# अमेरिकेला हापूस आंबे रवाना; निर्यातीसमोर आव्हाने



**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

यंदाच्या हंगामात हापूस आंब्याच्या निर्यातीसमोर नव्या अडचणी उभ्या ठाकल्या असून, आखाती प्रदेशातील तणावामुळे जलमार्ग वाहतूक विस्कळीत झाल्याने निर्यातदारांना हवाई मार्गाचा पर्याय स्वीकारावा लागत आहे. वाढत्या खर्चाच्या पार्श्वभूमीवरही अमेरिकेला हापूस आंब्याची पहिली खेप गुरुवारी हवाई मार्गाने रवाना करण्यात आली.

सुमारे १२०० किलो म्हणजेच ४४० बॉक्स हापूस आंबा हवाई मार्गाने अमेरिकेकडे पाठविण्यात आला. तसेच, शनिवारीदेखील १२०० किलो हापूस आंबा अमेरिकेला पाठविण्यात झाला असल्याचे निर्यातदार प्रकाश खक्कर यांनी सांगितले. मात्र, कच्च्या तेलाच्या किमतीत झालेल्या वाढीमुळे विमान वाहतुकीचे दर मोठ्या प्रमाणात वाढले असून निर्यातदारांना हा खर्च परवडत नसल्याची स्थिती निर्माण झाली आहे.

परंतु, अमेरिका आणि इतर देशातील हापूस आंब्याची मागणी लक्षात घेता व्यवसायाच्या दृष्टीने निर्यात करणे आवश्यक असल्याचे निर्यातदार सांगत आहेत. दरम्यान, आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत भारताला मेक्सिको आणि पेरू यांसारख्या देशांकडून स्पर्धा वाढत आहे. त्यामुळे भारतीय आंब्याच्या किमती वाढल्यास मागणी घटण्याची भीतीही निर्यातदारांकडून व्यक्त केली जात आहे.

# उरण एसटी डेपोविषयी कार्यक्रम



**उरण : बातमीदार**

उरण एसटी डेपोमध्ये एसटीविषयी आस्था आणि एसटी महामंडळाची व्यवस्था याविषयावर आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे साहित्यरत्न रायगडभूषण प्रा.एल.बी.पाटील आपल्या भाषणात म्हणाले की महाराष्ट्रातील मोठ्या शहरांपासून लहान खेड्यात लालपरी एसटीच्या भावनां आपुलकीच्या राहिल्या आहेत.त्यामुळे प्रत्येक माणसात एसटी विषयी आस्था असून खेडोपाड्यात एसटी थांबून नात्याप्रमाणे व्यवस्था मंडळाने केली आहे.

डेपोचे व्यवस्थापक गद्रे यांनी प्रास्ताविक करून पाहुण्यांचे स्वागत केले. यावेळी जेएनपीए फायनान्सचे डेप्युटी मॅनेजर महादेव घरत यांच्या सामाजिक सेवेबद्दल डेपो तर्फे सत्कार करण्यात आला.धनंजय पाटील यांनी सुरेख सूत्रसंचालन केले.

यावेळी विषयानुरूप शासनमान्य नशाबंदी विरोधात प्रचारक लवेंद्र मोकल यांनी. " माझी एसटी", आदर्श शिक्षक संजीव पाटील यांनी " घातक नशा तंबाखूची " ॲड.मच्छिंद्र घरत यांनी अभ्यासपूर्ण तंबाखूवर व्याख्यान दिले तर अनामिका राम या हिंदी भाषिक कवयित्रीची " लाल परी " ही कविता सादर करून एसटी कर्मचाऱ्यांना आनंद दिला.धनंजय पाटील यांनी पाहुण्यांचे आभार मानले.

### अभिनंदन अन् शुभेच्छा



**पनवेल : रायगड जिल्हा परिषदेच्या अध्यक्षपदी मंगेश वाकडीकर यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे माजी सरपंच किरण माळी, सीआरपी तालुका अध्यक्ष वेदिका कडव, गुलाब पाटील, उपसरपंच मीनल ठोंबरे, पोलीस पाटील सुजाता माळी, सामाजिक कार्यकर्ते धनाजी पाटील आदींनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# ऐन उन्हाळ्यात रसदार फळांचे दर घसरले

**नवी मुंबई : बातमीदार**

उन्हाळ्यात फळांना मोठी मागणी वाढते. त्यानुसार फळांच्या दरात ही वाढ होते, मात्र या उन्हाळ्यात फळांचे दर घसरलेले पाहायला मिळत आहेत. पुढच्या महिनाभर तरी हे दर असेच राहणार असल्याचे व्यापारी सांगत आहेत. त्यामुळे खवय्यांना चांगली रसदार, फळे खाताना हात आखडता घ्यावा लागणार नाहीय.

उन्हाळ्यात वातावरणातील उष्णता वाढत असल्याने शीतपेये, फळांचे रस, रसदार फळे खाण्याकडे नागरिकांचा कल जास्त असतो. त्यानुसारंग्रजांकडून बाजारात फळांची मागणी



वाढते. शेतकरी ही हंगाम पाहून फळांची लागवड करत असतात. त्यानुसार बाजारात ही रसदार फळे येतात. त्यानुसार सध्या बाजारात कलिंगड, टरबुज, पपई, द्राक्षे या फळांना मोठी मागणी आहे. त्यानुसार बाजारात ही या फळांची जास्त आवक पाहायला मिळत आहे.

कलिंगडाच्या तर बाजारात दररोज चाळीस पंचेचाळीस गाड्या येत आहेत. आवक जास्त होत असल्याने बाजारात कलिंगडाची जात पूर्णपणे कमी झाले आहे. दोन आठवड्यापूर्वी घाऊक बाजारात २५ ते ३० रुपये किलो असणारा कलिंगड आता मात्र दहा ते पंधरा रुपये किलो झाला आहे. ३० ते ३५ रुपये किलो असणारा टरबूज १८ ते २५ रुपये किलो झाला आहे. २० ते ३० रुपये किलो असणारा पपई १५ ते २० रुपये किलो झाला आहे.

भाऊ बाजारात दर कमी झाले असल्याने किरकोळ बाजारामध्ये त्याचा परिणाम पाहायला मिळत आहे. दोन आठवड्यापूर्वी एक कलिंगड १०० ते १२० रुपयांना खरेदी करावा लागत होता. तो आता किरकोळ बाजारात पन्नास रुपयात मिळत आहे. हीच परिस्थिती इतर फळांच्या बाबतीतही आहे. बाजारात आता द्राक्षांची ही आवक वाढत आहे त्यामुळे घाऊक बाजारात द्राक्ष सरासरी शंभर रुपये किलोच्या घरात आहेत. किरकोळ बाजारात द्राक्षे दीडशे रुपये किलो पर्यंत उपलब्ध झाली आहे. यापूर्वी द्राक्षे २०० ते २५० रुपये किलो होती.

दर कमी झाल्याने फळ खाणाऱ्यांना, आता फळे खरेदी करताना खिसा तपासावा लागणार नाहीये. पुढच्या महिन्यापर्यंत असेच राहणार असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले आहे.

# कामचुकार कंत्राटदारांवर नगर परिषदेची कारवाई

## ◆ श्रीवर्धनमध्ये अपूर्ण रस्त्यांमुळे नागरिक संतप्त;
## ◆ नगराध्यक्ष अतुल चौगुले यांचे कडक कारवाईचे संकेत



**श्रीवर्धन : बातमीदार**

श्रीवर्धन शहरातील अपूर्ण रस्ते आणि निकृष्ट दर्जाच्या विकासकामांमुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली असून आता नगरपरिषदेने कामचुकार कंत्राटदारांविरोधात कठोर भूमिका घेतली आहे. पावसाळा अगदी काही दिवसांवर येऊन ठेपला असतानाही अनेक ठिकाणी रस्ते आणि गटारांची कामे अपूर्ण असल्याने शहरातील परिस्थिती चिंताजनक बनली आहे.

शहरातील विविध भागांमध्ये रस्त्यांचे डांबरीकरण, गटारांची दुरुस्ती, तसेच कॉंक्रीट स्लॅब बसवण्याची कामे सुरू असली तरी ती अत्यंत संथ गतीने होत आहेत. अनेक कंत्राटदारांनी कामे पोटठेकेदारांना दिल्यामुळे अनुभवाच्या अभावातून कामांचा दर्जा घसरल्याचे चित्र दिसत आहे. परिणामी, काम पूर्ण करण्याच्या मुदती उलटूनही अनेक प्रकल्प रखडलेले आहेत.

विशेष म्हणजे, जीवना बंदर परिसरातील श्रीराम मंदिराकडे जाणारा रस्ता अद्यापही कच्च्या अवस्थेत असून, पेव्हर ब्लॉक बसवण्याचे कंत्राट घेऊनही संबंधित कंत्राटदाराने काम सुरूच केलेले नाही. त्यामुळे भाविक आणि स्थानिक नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

दरम्यान, हवामान खात्याने अवकाळी पावसाचा इशारा दिल्यामुळे अपूर्ण कामांमुळे परिस्थिती बिकट होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. खोदकाम केलेली गटारे आणि अर्धवट रस्ते नागरिकांसाठी धोकादायक ठरत आहेत.

या पार्श्वभूमीवर नागरिकांनी नगरपरिषदेकडे तातडीने कामे पूर्ण करण्याची आणि निष्क्रिय कंत्राटदारांवर कारवाई करण्याची जोरदार मागणी केली आहे.

नगराध्यक्ष अतुल चौगुले यांनी स्पष्ट इशारा देत सांगितले की, "ज्या कंत्राटदारांनी कामे अपूर्ण ठेवली आहेत, मुदती ओलांडल्या आहेत किंवा निकृष्ट दर्जाची कामे केली आहेत, त्यांना कायदेशीर नोटिसा देण्यात येतील. दोषी आढळल्यास कठोर कारवाई करून संबंधितांना काळ्या यादीत टाकण्यात येईल."

नगरपरिषदेच्या या भूमिकेमुळे कामचुकार कंत्राटदारांमध्ये खळबळ उडाली असून, येत्या काही दिवसांत प्रशासनाकडून ठोस कारवाई होण्याची शक्यता आहे.

## माणगावात रामनवमीनिमित्त शोभायात्रा

**माणगाव : प्रतिनिधी**

झपाट्याने विस्तार होणाऱ्या आणि मुंबई-गोवा महामार्गावर वसलेल्या व भौगोलिकदृष्ट्या रायगड जिल्ह्याचे मध्यवर्ती ठिकाण असलेल्या माणगांव शहरात गुरुवारी समस्त माणगांवकर हिंदू बांधवांकडून श्री रामनवमी, रामजन्मोत्सव व शोभा यात्रेचे आयोजन करण्यात आले होते. हे ४ थे वर्ष असून या शोभायात्रेसाठी थेट आयोध्यवरून श्री रामांची मूर्ती दर्शनासाठी आणण्यात आली होती.



शोभायात्रेत श्री रामाचे दर्शन घेण्यासाठी माणगांव शहरात हजारोंच्या संख्येने जनसागर लोटला होता. जय जय श्री राम गजराने संपूर्ण माणगांव शहर दुमदुमून निघाले होते. कोकणातील सर्वात मोठी श्री राम नवमी माणगाव शहरात शांततेत पार पडली.

ही शोभायात्रेचा प्रारंभ माणगांव विकास कॉलनी येथील श्री साई मंदिर तहसील कार्यालय पटांगण येथून ढोल ताशांच्या गजरात सुरू करण्यात आली. ती पुढे कचेरी रोड ते मुंबई गोवा महामार्ग बाजारपेठ ते बालाजी कॉम्प्लेक्स व परत सोनभैरव मंदिर( खांदाड) येथे शोभायात्रेची सांगता करण्यात आली. रस्त्याच्या दुतर्फा रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. मुंबई गोवा महामार्गावर भव्य अशा कमानी उभारण्यात आल्या होत्या.

या वर्षी मुख्य आकर्षण श्री प्रभू रामचंद्र भव्य प्रतिमा आणि खास दिल्ली येथून उड्डाण करून करून दाखल झालेले श्री महाबली हनुमान सर्व रामभक्तांना साक्षात दर्शन दिले. भव्य श्री विठ्ठल रखुमाई मूर्ती सर्वांसाठी आकर्षण ठरली. तसेच भजनी मंडळ आणि वारकरी संप्रदाय टाळ - मृदुंगाच्या गजरात सुश्राव्य भजन करीत रामनामाचा जयघोष केला.

या शोभायात्रे संपूर्ण तालुक्यातून हिंदु बांधव, महिला, श्री राम भक्त व विविध राजकीय, सामाजिक क्षेत्रातले पदाधिकारी, व माणगांवकर उपस्थित होत्या. सायंकाळ श्री राम मंदिर खांदाड महाआरती करण्यात आली. तसेच सोनभैरव मंदिर खांदाड येथे महाप्रसादाचेदेखील नियोजन करण्यात आले होते.

---

## म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेसचा ऐतिहासिक विजयोत्सव साजरा

**म्हसळा : प्रतिनिधी**

नुकत्याच पार पडलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीत म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाने दणदणीत यश संपादन करत आपली मजबूत पकड सिद्ध केली आहे. तालुक्यातील २ जिल्हा परिषद गट आणि ४ पंचायत समिती गणांमध्ये पक्षाच्या उमेदवारांनी विजय मिळवत जनतेचा स्पष्ट कौल आपल्या बाजूने वळवला आहे.

या निकालामुळे संपूर्ण तालुक्यात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून कार्यकर्त्यांमध्ये जल्लोष पाहायला मिळत आहे.या ऐतिहासिक विजयाच्या पार्श्वभूमीवर म्हसळा शहरात नवनिर्वाचित सदस्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. ढोल-ताशांच्या गजरात, फटाक्यांच्या आतषबाजीमध्ये आणि घोषणांच्या गजरात शहर दणाणून गेले. मोठ्या संख्येने नागरिकांनी रस्त्याच्या दुतर्फा उभे राहून विजयी उमेदवारांचे स्वागत केले. मिरवणुकीनंतर आयोजित जाहीर सभेत सर्व विजयी उमेदवारांचा सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी मार्गदर्शन करताना सुनील तटकरे यांनी सांगितले की, "हा विजय केवळ निवडणुकीचा निकाल नसून जनतेने राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या विचारांवर, विकासाभिमुख धोरणांवर




आणि पारदर्शक कारभारावर दाखवलेला ठाम विश्वास आहे. कार्यकर्त्यांनी केलेले काटेकोर नियोजन, समन्वय आणि दिवस-रात्र केलेले अथक परिश्रम यामुळेच हा ऐतिहासिक विजय शक्य झाला आहे."

ते पुढे म्हणाले की, "म्हसळा तालुक्यातील हा विजय म्हणजे येणाऱ्या काळातील मोठ्या विकासाची नांदी आहे. जनतेने आमच्यावर जो विश्वास ठेवला आहे, तो आम्ही निश्चितच सार्थ ठरवू. रस्ते, पाणीपुरवठा, शिक्षण, आरोग्य आणि रोजगाराच्या संधी निर्माण करण्यासाठी ठोस पावले उचलण्यात येतील."

यावेळी त्यांनी कार्यकर्त्यांचे विशेष कौतुक करत सांगितले की, "प्रत्येक कार्यकर्त्याने पक्षाशी निष्ठा ठेवत घराघरात पोहोचून जनतेशी संवाद साधला. याच एकजुटीमुळे विरोधकांना पराभवाचा सामना करावा लागला."सभा स्थळी उपस्थित नागरिकांमध्येही मोठा उत्साह दिसून आला. अनेकांनी या विजयातून तालुक्याच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली.दरम्यान, विजयी उमेदवारांनीही जनतेचे आभार मानत विकासकामांना प्राधान्य देण्याचा संकल्प व्यक्त केला. "हा विजय आमचा नसून जनतेचा आहे. तालुक्याच्या प्रगतीसाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू," असे त्यांनी स्पष्ट केले.एकूणच, म्हसळा तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या या घवघवीत यशामुळे आगामी काळात राजकीय समीकरणांवर मोठा प्रभाव पडणार असून विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात होणार,अशी चर्चा सुरू आहे.

## द्रुतगती मार्गावरील फूडमॉलमधून दागिने लंपास

**खालापूर :** मुंबई-पुणे एक्स्प्रेसवरून प्रवास करणाऱ्या प्रवासी महिलेचे दोन लाख १४ हजार रुपये किमतीचे सोन्याचे दागिने फूडमॉल येथून चोरीला गेल्याची घटना रविवारी (ता. २२)घडली. या प्रकरणी शुक्रवारी खोपोली पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पिशवी बसमध्ये ठेऊन जेवणासाठी खाली उतरले असताना दागिन्यांचे पिशवी चोरट्याने लंपास केल्याचे पोलिसांना देण्यात आलेल्या तक्रारींत नमूद करण्यात आले आहे.

---

## खोटे दस्तनोंदणी प्रकरणी तिघांविरोधात गुन्हा दाखल

**खालापूर :** तोतया व्यक्ती उभा करून बनावट दस्त नोंदणी केली आणि फ्लॅटची विक्री केल्याची घटना शुक्रवारी खालापूरात घडली आहे.

फ्लॅटचे मूळ मालक प्रकाश फुटरमल जैन (वय ७५, रा. ठाणे) यांनी राजीव नरेंद्र गोयल (रा. कल्याण), कन्हैया शामलाल कुकरेज (रा. ठाणे) व तोतया इसमाविरोधात खालापूर पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

प्रकाश जैन यांचा खालापूर हद्दीत ताकई येथे फ्लॅट आहे. त्यांच्या नकळत राजीव आणि कन्हैया यांनी तोतया इसम उभा करत प्रकाश यांचे नावाचे बनावट आधारकार्ड व पॅनकार्ड बनवले होते. या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आल्याने गुन्हा दाखल केला आहे

## माणगावमध्ये चैत्रगौरी हळदी कुंकू समारंभ एका अनोख्या पद्धतीने व उत्साहात साजरा

**माणगाव : प्रतिनिधी**

आपली महाराष्ट्रीयन संस्कृती केवळ आपल्या भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात नेहमीच आपले वेगळेपण सिद्ध करते.आपण साजरे करीत असलेले सण-समारंभ,आपल्या चालीरीती, परंपरा केवळ श्रद्धा जपत नाहीत तर त्यामागे अभ्यासू विज्ञान आहे. असाच एक सोहळा म्हणजे चैत्र महिन्यातील माता गौरीच्या पूजनाचा व हळदीकुंकू समारंभाचा.

स्वच्छतेची ज्योत घेऊन चालते ती वाट, प्रत्येक घर उजळते तिच्या कष्टाची साथ,हातात झाडू, मनात सेवा हाच तिचा ध्यास,स्वच्छता मैत्रीण म्हणजे समाजाचा खास श्वास. या उक्तीने प्रेरित होऊन माणगावमधील "सामाजिक प्रबोधन चैत्रगौरी ग्रुप, माणगाव"



यांच्या वतीने घरकाम करणाऱ्या महिलांचा कौतुक सोहळा व हळदी-कुंकू समारंभ मंगळवार दिनांक २४ रोजी आयोजित करण्यात आला होता.

समाजामध्ये महिलांच्या प्रबोधनाचे कित्येक कार्यक्रम साजरे केले जातात मात्र फक्त आणि फक्त स्वच्छतामैत्रिणींसोबत मैत्री करण्यासाठी व त्यांना आनंद देण्यासाठी या खास आणि आगळ्यावेगळ्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.माणगाव मध्ये या अशा कार्यक्रमाचे आयोजन प्रथमच करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला उपस्थित स्वच्छता मैत्रिणींच्या हस्ते चैत्रगौरीचे पूजन करण्यात आले. या महिलांच्या कलागुणांना वाव मिळावा व त्यांनी स्वतः व्यक्त व्हावे यासाठी गीतगायन, रांगोळी, उखाणा घेणे, फुगडी, सिनेमांची, पदार्थांची नावे सांगणे, मराठी महिन्यातील सणांशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले. तसेच विजेत्यांनाभेटवस्तूही देण्यातआल्या. माणगाव नगरपंचायतीच्या उपनगराध्यक्ष सौ रिया रत्नाकर उभारे यांनी या कार्यक्रमाला आपला अमूल्य वेळ देऊन शुभेच्छा दिल्या तसेच याप्रसंगी राज्यपुरस्कारप्राप्त आदर्श शिक्षिका अपूर्वा जंगम यांनी महिलांसोबत सुसंवाद साधला, त्यांना उद्बोधित व प्रेरित केले. स्वच्छतामैत्रिणींना मार्गदर्शन केले

ही सुंदर व सृजनशील संकल्पना माणगावच्या माजी उपसरपंचज्योती बुटाला यांनी मांडली व ती प्रत्यक्ष उतरविण्यासाठी त्यांच्यासह सायलीबाक्कर,शोभा धारिया, मनीषाढवण,भारती महाळुंगे,श्रीमती मेघना येलवे, रेश्मा पानसरे, भानुमती शेठ व सुजाता भाभी यांनी मेहनत घेतली.या कार्यक्रमासाठी घरकाम करणाऱ्या २५०महिलांनी आपली उपस्थिती दर्शविली.

## भावे नाट्यगृहात जागतिक रंग दिन साजरा



**नवी मुंबई : बातमीदार**

जागतिक रंगभूमी दिन साजरा शुक्रवार २७ मार्च २०२६ रोजी नवी मुंबईतील नाट्यकर्मी आणि भावे कट्टा सर्व कलाप्रेमींनी जागतिक रंगभूमी दिन साजरा केला. विष्णुदास भावे नाट्यगृह येथे नटराज पूजन व विष्णुदास भावे यांच्या प्रतिमेला पुष्पहार व पूजन करून जागतिक रंगभुमी दिन साजरा केला.

यावेळी ज्येष्ठ रंगकर्मी श्रीहरी पवळे, अशोक पालवे, वैभव वराडी, जितेंद्र लाड, सुनील सावंत, देवा सरकटे भावे नाट्यगृहातील पदाधिकारी गिरीश चावरे, संतोष जाधव, महादेव कांबळे, सुशीला भणगे, सिताराम वरटा, आणि भावे नाट्यगृहातील सर्व कर्मचारी उपस्थित होते. ज्येष्ठ रंग कर्मी श्रीहरी पवळे यांनी उपस्थित सर्वांना रंगभूमी दिनाच्या शुभेच्छा देऊन जागतिक रंगभूमी विषयी माहिती सांगितली त्याचबरोबर अशोक पालवे यांनी शुभेच्छा देऊन सर्व भावे नाट्यगृहातील कर्मचाऱ्यांचे कौतुक केले.

## जांबरुंग ठाकुरवाडीतील विद्यार्थ्यांना ४६ सायकलचे वाटप



**खोपोली : प्रतिनिधी**

देश प्रगतीच्या दिशेने वाटचाल करत असताना, आजही आदिवासी समाजातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वाटचाल करताना अनेक अडचणींना सामना करावा लागत आहे.

खालापुर तालुक्यातील ग्रामीण जांबरुंग ठाकुरवाडीतील रायगड जिल्हा परिषद शाळेमधील विद्यार्थ्यांना वाहनाचे साधन नसल्याने अडीच ते तीन किलोमीटरचे अंतर पायी चालत जाऊन शिक्षणाचे धडे गिरवावे लागतात.

येथील विद्यार्थ्यांची अडचण लक्षात घेऊन इनरव्हील क्लब ऑफ बॉम्बे तर्फे व कॅनडा रोबको संस्थेच्या माध्यमातून ४६ सायकलींचे वाटप करत विद्यार्थ्यांची मोठ्या अडचणीतून सुटका केली. २७ मार्च रोजी या सायकली विद्यार्थ्यांना सुपूर्द करण्यात आल्यावर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळेच समाधान पाहायला मिळाले.

यावेळी जांबरुंग ग्रामपंचायतच्या सरपंच शिल्पा खांडेकर , उपसरपंच संदेश कांबले, सामाजिक कार्यकर्ते प्रशांत खांडेकर, माजी सरपंच रमेश खांडेकर, ग्रामपंचायत सदस्य मारुती गायकर, ग्रामविकास अधिकारी संतोष पवार, वरिष्ठ विस्तार अधिकारी शिल्पा दास, केंद्रप्रमुख गोविंद दरवडा, इनर व्हील क्लब चेअरमन भावना त्रिवेदी, कॅनरा रोबेको संचालक भावना दोसी, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष भगवान हिंदोला, उपाध्यक्ष अलका मेंगाल, सदस्य तातू हिंदोला, अनंता मेंगाल, आदी प्रमुखासह बचत गटातील महिला वर्ग, अंगणवाडी सेविका आशा वर्कर, ग्रामस्थ , पालक व विद्यार्थी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

---

## विकास कॉलनी शाळेत माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात



**माणगाव : प्रतिनिधी**

शनिवार दिनांक २८ मार्च २०२६ रोजी रा .जि.प . शाळा विकास कॉलनी येथे माजी विद्यार्थी स्नेहमेळावा उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमासाठी उतेखोल केंद्राचे केंद्रप्रमुख शंकर शिंदे , माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नितीन बामुगडे, माजी विद्यार्थी अमोल जंगम,योगेश तेंडुलकर,राजेंद्र कोळवणकर ,भुतकर,राखी चिनके, शाळा समिती व पालक उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व दीप प्रज्वलन झाले .इयत्ता चौथीच्या विद्यार्थ्यांनी सुरेल व सुमधुर आवाजात ईशस्तवन ,स्वागत गीत गाऊन कार्यक्रमाची सुरुवात केली. आलेल्या मान्यवरांचे शाळेकडून स्वागत व सत्कार करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका पुर्वा येलवे यांनी आपल्या प्रास्ताविकेतून शाळेचा सर्वांगिण गुणवत्ता विकास होण्यासाठी माजी विद्यार्थी संघ महत्त्वाची भूमिका बजावत असतो हे स्पष्ट केले. त्यानंतर शाळेच्या आजी विद्यार्थी इयत्ता चौथी स्वरा प्रभाकर मसुरे या विद्यार्थिनींने इंग्रजी मधून आपले मनोगत व्यक्त केले त्याचबरोबर इयत्ता चौथीतील निशिता निलेश पालवणकर, महेश अनिल पाटील, प्रज्ञा अमीर केकाणे इयत्ता तिसरी या विद्यार्थ्यांनी माजी विद्यार्थ्यांविषयी मनोगत व्यक्त केले. माजी विद्यार्थी संघाचे अध्यक्ष नितीन बामुगडे यांनी आपल्या मनोगतात आपल्या शाळेतील जुन्या आठवणी जाग्या केल्या व सध्याच्या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

## विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता सतिश नाईक सेवानिवृत्त



**खालापूर : प्रतिनिधी**

महाराष्ट्र शासन अभियोग संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, रायगड - अलिबाग तर्फे ॲड. सतिश य. नाईक (विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता, मुरुडरायगड) यांचा . अशोक कुमार भिल्लारे (संचालक, अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य मुंबई) यांच्या प्रमुख उपस्थितीत मिहीर फार्म, नवेदर बेली येथे सेवापूर्ती कार्यक्रम उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाला.

या प्रसंगी. श्रीमती शिल्पा सु. महातेकर (सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता, रायगड), ॲड. प्रसाद पाटील (अध्यक्ष, रायगड जिल्हा व अलिबाग बार असोसिएशन व माजी जिल्हा सरकारी वकील) तसेच . ॲड. अनंत पाटील (उपाध्यक्ष, रायगड जिल्हा व अलिबाग बार असोसिएशन), अतिरीक्त सरकारी अभियोक्ती बहिरम व जिल्ह्यातील न्यायालयातील सर्व शासकीय अभियोक्ते यांची विशेष उपस्थिती लाभली.

# आयपीएलमध्ये किंग कोहलीचा जलवा

## पाकिस्तानच्या शोएब मलिकचा विक्रम मोडत रचला नवा इतिहास

**बंगळूरू : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात आयपीएल २०२६ चा उद्घाटन सामना खेळवण्यात आला. एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर सनरायझर्स हैदराबादच्या संघाने ठेवलेल्या २०२ धावांचा पाठलाग करताना चेज मास्टर विराट कोहलीनं नाबाद अर्धशतक झळकावले. या खेळीसह RCB संघाला दिमाखदार विजय मिळवून देताना विराट कोहलीनं नवा इतिहास रचला आहे. विराट कोहलीनं या सामन्यात पाकिस्तानच्या शोएब मलिकचा टी-२० क्रिकेटमधील मोठा विक्रम मोडीत काढला आहे.



याआधी टी-२० क्रिकेटमध्ये सर्वाधिक धावा करणाऱ्या आशियाई फलंदाजांच्या यादीत शोएब मलिक बादशहा होता. पण आता कोहलीनं त्याचा विक्रम मोडीत काढत आशियाचा नवा सम्राट बनला आहे. शोएब मलिकनं आपल्या टी-२० कारकिर्दीत ५५७ सामन्यांत १३,५७१ धावा केल्या होत्या. विराट कोहलीने ४१५ सामन्यांतच हा आकडा पार करत नवा इतिहास रचला आहे. आयपीएल २०२६ च्या सलामीच्या लढतीत २७ धावा पूर्ण करताच कोहलीनं या विक्रमाला गवसणी घातली.

विराट कोहलीनं सनरायझर्स विरुद्धच्या सामन्यात ३८ चेंडूत ५ चौकार आणि ५ षटकारांच्या मदतीने ६९ धावांची नाबाद खेळी साकारली. आयपीएलमधील त्याचे हे विक्रमी ६४ वे अर्धशतक आहे. एवढी अर्धशतके अन्य कोणत्याही फलंदाजाने झळकावलेली नाहीत. IPL मध्ये सर्वाधिक (८७३०) धावांचा रेकॉर्डही किंग कोहलीच्या नावेच आहे.

विराट कोहलीने २०२४ मध्ये टी-२० वर्ल्ड कप जिंकल्यानंतर आंतरराष्ट्रीय टी-२० क्रिकेटमधून निवृत्ती घेतली होती. भारतासाठी त्याने १२५ सामने खेळताना ४,१८८ धावा केल्या आहेत. ज्यात ३८ अर्धशतके आणि एक शतक समाविष्ट आहे.

### विरुष्काच्या फ्लाइंग किससह स्मृतीची रिॲक्शनही व्हायरल

**बंगळूरू :** या सामन्यानंतर विराट कोहली आणि अनुष्का शर्मा यांच्यात एकमेकांवर प्रेमाची उधळण करण्याचा खेळ रंगल्याचे पाहायला मिळाले. विराट कोहलीनं स्टॅंडमध्ये उपस्थितीत अनुष्काला चक्क फ्लाइंग किस दिला. तिनेही क्षणाचाही विलंब न करता त्याला फ्लाइंग किस देत रिप्लाय दिला. विराटचा प्रेम व्यक्त करण्याचा हा अंदाज पाहून अनुष्काच्या शेजारी बसून मॅचचा आनंद घेणारी टीम इंडियाची क्वीन आणि आरसीबी महिला संघाची कर्णधार स्मृती मानधनाही आश्चर्यचकित झाली.

# सनरायझर्स हैदराबादच्या इशान किशनचे वादळ

**बंगळूरू : वृत्तसंस्था**

आयपीएल २०२६ स्पर्धेची दमदार सुरुवात झाली आहे. स्पर्धेतील पहिला सामना रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू आणि सनरायझर्स हैदराबाद या दोन्ही संघांमध्ये सुरु आहे. बंगळुरूतील एम चिन्नास्वामी स्टेडियमवर सुरु असलेल्या या सामन्यात रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचा कर्णधार रजत पाटीदारने नाणेफेक जिंकून प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. दरम्यान प्रथम फलंदाजी करण्यासाठी आलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाकडून संघाचा नवा कर्णधार इशान किशनने मोठ्या रेकॉर्डला गवसणी घातली आहे.



या सामन्यात सनरायझर्स हैदराबाद नाणेफेक गमावून प्रथम फलंदाजी करण्यासाठी यावं लागलं. पण हैदराबादला हवी तशी सुरुवात करता आली नाही. संघातील प्रमुख फलंदाज स्वस्तात माघारी परतले. बंगळुरूचं मैदान छोटं आहे. त्यामुळे अभिषेक शर्मा आणि ट्रॅव्हिस हेडकडून चांगल्या सुरूवातीची गरज होती. पण ही जोडी स्वस्तात माघारी परतली. त्यानंतर इशान किशन आणि हेनरिक क्लासेन यांनी मिळून संघाचा डाव सांभाळला. यादरम्यान इशान किशनने ३००० धावांचा पल्ला गाठला आहे. यादरम्यान आयपीएलमध्ये सर्वात वेगवान ३००० धावा करणारा तो सहावा भारतीय फलंदाज ठरला आहे. इशान किशनने २१८० चेंडूत ३००० धावांचा पल्ला गाठला आहे. आयपीएलमध्ये सर्वात जलद ३००० धावा पूर्ण करण्याचा रेकॉर्ड हा रिषभ पंतच्या नावावर आहे. रिषभ पंतने २०२८ चेंडूत ३००० धावा पूर्ण केल्या होत्या.

या सामन्यातील पहिल्या डावात फलंदाजी करण्यासाठी आलेल्या सनरायझर्स हैदराबाद संघाने २० षटकांअखेर ९ गडी बाद २०१ धावा केल्या.
















पनवेल : दानशूर व्यक्तिमत्व, रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त आयोजित 'रामपर्व' हा भव्य सांस्कृतिक सोहळा श्री छत्रपती शिवाजी विद्यालय व ज. आ. भगत ज्युनियर कॉलेज गव्हाण-कोपर, माजी विद्यार्थी आणि सहकारी यांच्या वतीने मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात झाला.


वर्ष २१ वे




ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।



विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।



सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।



तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पुरस्कृत
माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित

वै. ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने
ह.भ.प. बानुबाई (खारकोपर) यांच्या उपस्थितीत.





अखंड हरिनाम सप्ताह

ग्रंथराज श्री ज्ञानेश्वरी सामुदायिक पारायण सोहळा

व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)

प्रारंभ चैत्र शुद्ध १३, मंगळवार, दि. ३१/३/२०२६

देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वाजता

सांगता चैत्र कृ. ५, मंगळवार, दि. ७/४/२०२६

सर्व भाविकांना कळविण्यात आनंद होत आहे की, सालाबादप्रमाणे माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण तर्फे स्वा. सु.ह.भ.प. वै. सदानंद गुरुजी (देवाची आळंदी) यांचे परमशिष्य ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (देवाची आळंदी) यांच्या प्रेरणेने ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा चैत्र शुद्ध १३, मंगळवार दि. ३१/०३/२०२६ ते चैत्र कृ. ५ मंगळवार दि. ७/०४/२०२६ रोजी संपन्न होत आहे. तरी कृपया सर्व भाविकांनी ह्या पर्वणीचा लाभ घ्यावा, ही नम्र विनंती.

दैनंदिन कार्यक्रम

पहाटे ४.०० ते ६.०० वा. - काकडा
सकाळी ८.०० ते १२.३० वा. - ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. - प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. - सामुदायिक हरिपाठ
रात्री ०७.३० ते ०९.३० वा. - कीर्तन

मंगळवार, दि. ३१/०३/२०२६
प्रवचन - ह.भ.प. बळीराम महाराज (वाघीवली)
हरिपाठ - विठ्ठल रखमाई हरिपाठ मंडळ, खारकोपर
किर्तनकार - ज्ञानेश्वरी साधक ह.भ.प. नकुल महाराज भोईर (कोपरी-नवी मुंबई)
सौजन्य - श्री. सुधीर तुळशिदास ठाकूर (खारकोपर)

बुधवार, दि. ०१/०४/२०२६
प्रवचन - ह.भ.प. दिपक महाराज (कुंडेगाव)
हरिपाठ - श्री गणेश हनुमान हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. श्रीकांत महाराज दुराफे (आळंदी - देवाची)
स्मरणार्थ - कै. सविता शिवाजी देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

गुरुवार, दि. ०२/०४/२०२६
प्रवचन - ह.भ.प. मनीज महाराज (बेलपाडा)
हरिपाठ - भैरवनाथ हरिपाठ मंडळ, धुतूम
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. मारुती महाराज कोलाटकर (देवकान्हे-रोहा)
सौजन्य -सौ. श्रध्दा रमेश ठाकूर (खारकोपर)

शुक्रवार, दि. ०३/०४/२०२६
प्रवचन - ह.भ.प. राजेंद्र गुरुजी (कुंडेगाव)
हरिपाठ - शिवशंभी हरिपाठ मंडळ, कुंडेगाव
किर्तनकार - ह.भ.प. विक्रम महाराज थोरवे (गणेगाव- कर्जत)
स्मरणार्थ - कै. शिवाजी गजानन पाटील
सौजन्य - सौ. ललिता सुनिल पाटील (खारकोपर)

शनिवार, दि. ०४/०४/२०२६
प्रवचन - ह.भ.प.अशोक महाराज (बामणडोंगरी)
हरिपाठ- जय हनुमान प्रासादिक हरिपाठ मंडळ, बामणडोंगरी
किर्तनकार - ह.भ.प. विक्रांत महाराज पोंडेकर (आळंदी-देवाची)
स्मरणार्थ - कै. गिताबाई त्रिंबक देशमुख
सौजन्य - श्री. विराज जयवंत देशमुख (गव्हाण)

रविवार, दि. ०५/०४/२०२६
प्रवचन - ह.भ.प. रोशन महाराज ठाकूर (बेलपाडा)
हरिपाठ - श्री कृष्ण हरिपाठ मंडळ, बेलपाडा
किर्तनकार - ह.भ.प. भगिरथ महाराज काळे (सिन्नर)
स्मरणार्थ - कै. शिवाजी रघुनाथ देशमुख
सौजन्य - श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण)

सोमवार, दि. ०६/४/२०२६
सकाळी ८.३० वा - ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन
सायं ४ ते ५ वा - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा
सामुदायीक हरिपाठ
किर्तनकार - ह.भ.प. डॉ. चारुदत्त महाराज आफळे (पुणे)
स्मरणार्थ - कै. यमुना वसंतशेठ पाटील
सौजन्य - ह.भ.प. वसंतशेठ हरि पाटील (खारकोपर)

काल्याचे कीर्तन: मंगळवार, दि. ०७/०४/२०२६ रोजी सकाळी १० ते १२ वा. ह.भ.प. श्रावण महाराज अहिरे (नाशिक),
सौजन्य : श्री. महेंद्रशेठ तुकाराम घरत
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com